नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

सप्टेंबर १९५०

★

संपादक :
वामन कृष्ण चोरघडे

किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत व वऱ्हाड शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

वर्ष ५ वें] युगवाणी [अंक ९

सप्टेंबर १९५०

वार्षिक वर्गणी पांच रुपये ✲ सभासदांना फक्त तीन रुपये

अनुक्रमणिका

वि. सा. संघ वार्ता.

१	संत नामदेव—वि. भि. कोलते	२६९
२	नाट्याचार्य देवल—द. रा. गोमकाळे	२८०
३	निद्रेस (कविता)—द. रा. जोशी	२८५
४	वृक्षांची जीवनकथा —प्रा. म. वा. मिराशी	२८७
५	सावळाराम—म. श्री. मंगरूळकर	२९४
६	कजलीचें धन—ना. रा. शेंडे	३००
७	महाकोसलच्या प्राचीन इतिहासावर नवीन प्रकाश-(प्रा. मिराशी)	३०४
८	अपराध (कविता)—चं. . शहाणे	३०६
९	एकांकिकेसंबंधीं थोडेसें—शं. वा. कुळकर्णी	३०७

विदर्भ साहित्यसंघ-वार्ता

अमरावती येथे शाखा स्थापना

विदर्भ साहित्यसंघाच्या अमरावती येथील सभासदांची सभा उदय कार्यालयांत भरून त्यांत अमरावती शहर स्थानिक शाखा स्थापन करण्यांत आली. त्यांत पदाधिकाऱ्यांची निवड खालीलप्रमाणे करण्यांत आली. अध्यक्ष—प्रा. ग. त्र्यं. देशपांडे; उपाध्यक्ष—श्री. द. शं. फडके; चिटणीस—प्रा. मा. ल. व्यवहारे व श्री. मनोहर बाळापुरे आणि सभासद--श्री. ना. क. तांबी, सौ. इंदुताई दामले व सौ. ताराबाई पाध्ये. याशिवाय तुकाराम जयंती, वादविवाद व वि. सा. संघाच्या परीक्षांविषयी चर्चा करण्यांत आली.

विदर्भ साहित्यसंघाच्या अमरावती शाखेचा उद्घाटन समारंभ १३ मे ५० रोजीं डॉ. जोशी हॉलमध्ये श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. शाखेचें उद्घाटन नामदार पु. का. देशमुख, शिक्षणमंत्री मध्यप्रदेश यांनी केलें. याच प्रसंगीं तुकाराम त्रिशत सांवत्सरिक उत्सव करण्यांत येऊन संत विवरेकर महाराज यांचें जाहीर प्रवचन झालें.

वि. सा. संघाच्या स्थानिक शाखेची सभा २० जून ५० रोजीं उदय कार्यालयांत होऊन कै. साने गुरुजी यांच्या मृत्यूबद्दल दुखवट्याचा ठराव पास झाला.

शकुंतला दिवाणजी
सचिटणीस
वि. सा. संघ.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संत नामदेव

वि. भि. कोलते

*

महाराष्ट्रीय संतांच्या कामगिरीकडे दिवसेंदिवस विद्वानांचे अधिकाधिक लक्ष वेधले जात आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. प्रा. न. र. फाटक यांच्या 'ज्ञानेश्वर' आणि 'एकनाथ' यांच्यावरील लेखमाला, 'पाच संतकवि' हा डॉ. तुळपुळे यांचा ग्रंथ, 'महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य' हा श्री. बा. रं. सुंठणकर यांचा विचारपरिप्लुत प्रबंध इत्यादि पुस्तके याची साक्ष देतील. गेल्या काही वर्षांत संत नामदेवाच्या कर्तृत्वासंबंधीहि महत्त्वाचे लिखाण प्रसिद्ध झाले आहे. श्री. अ. का. प्रियोळकर यांनी लिहिलेल्या इंग्रजी व मराठी लेखमाला आणि श्री. शं. पु. जोशी यांचा 'पंजाबातील नामदेव' हा संशोधनात्मक प्रबंध यांचा त्यात अंतर्भाव होतो. हे सर्व प्रयत्न अभिनंदनीय आहेत यांत शंका नाही. पण असे कार्य पायाशुद्धरीतीने होण्यासाठी प्रत्येक संताने लिहिलेल्या ग्रंथांच्या अधिकृत संहिता प्रसिद्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांच्या कर्तृत्वाचे मोजमाप योग्य रीतीने होऊ शकणार नाही. अशा अधिकृत संहिता तयार करण्याकडे विद्वानांचे लक्ष जितक्या लौकर जाईल तितके पाहिजे आहे.

'अधिकृत' हा शब्द या ठिकाणी वापरला आहे खरा, पण त्याला परिस्थितीमुळे अनेक मर्यादा पडलेल्या आहेत याची स्पष्ट जाणीव मला आहे आणि ती मनात बाळगूनच मी हा मजकूर लिहीत आहे. प्रत्यक्ष लेखकाच्या हातचे बाड मिळवून त्याबरहुकूम एखादा ग्रंथ छापला जाणे हेच वस्तुत: अधिकृततेचे प्रमाण होय. पण जुन्या संतकवींच्या बाबतीत हे जवळजवळ अशक्य आहे. प्रसंगप्राप्त स्फूर्तीने त्यांच्याकडून अभंगरचना होत असे आणि मागाहून बहुधा त्यांच्या एखाद्या भक्त 'लेखका' कडून ती लिहिली जात असे. अर्थात्, जेथे प्रत्यक्ष कवीच्या हातचे बाड मिळणे अशक्यप्राय ठरते तेथे त्याच्या 'लेखका'ने किंवा निकटवर्ती शिष्याने लिहिलेले बाड प्रमाण धरले पाहिजे. तुकारामाच्या बाबतीत, संताजी जगनाडे यांनी लिहून ठेवलेल्या अभंगांच्या वह्या ह्याच विशेष प्रमाणभूत मानल्या पाहिजेत. दुर्दैवाने ह्या सर्व वह्या उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे तुकारामाचे सर्व अभंग जगनाडे यांच्या हातून लिहिलेल्या स्वरूपात महाराष्ट्राला मिळू शकले नाहीत. कल्याणाने लिहिलेला आणि रामदासांनी आपल्या हाताने दुरुस्त केलेला 'दासबोध' हा अधिकृत ग्रंथाचे त्यातल्या त्यात उत्कृष्ट उदाहरण म्हणून सांगता येईल. मराठीच्या

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आरंभकाळातील म्हणजे तेराव्या, चौदाव्या व पंधराव्या शतकातील लेखक–कवींच्या कृतींच्या बाबतीत अर्थात् हेहि शक्य नाही. कारण साधारणपणे या काळातील मराठी हस्तलिखित अद्यापपर्यंत उपलब्ध होण्याचा योग आलेला नाही. अशा परिस्थितीत 'अधिकृत' संहिता तयार करणे जवळजवळ अशक्यच आहे. म्हणून यापुढील सर्वोत्कृष्ट मार्ग स्वीकारण्यावाचून गत्यंतर नाही. हा मार्ग म्हणजे शक्य तितक्या जुन्यात जुन्या प्रति जमा करून त्यांच्या साह्याने प्रमाणभूत आवृत्ति तयार करणे. अर्थात् असे करताना संपादकांनी संहिता–संपादनाच्या सर्वमान्य तत्त्वांचे पालन कसोशीने करणे अवश्य आहे. अशा प्रयासानंतर तयार झालेल्या ग्रंथाच्या साह्याने काढलेली अनुमाने हीच सर्वमान्य होण्याजोगी ठरतील हे काय सांगायला पाहिजे!

जुन्या ग्रंथांच्या संहितांचा प्रमाणभूतपणा भाषा व मजकूर या दोन्ही दृष्टींनी असावयाला पाहिजे. संतकवींच्या ग्रंथांचे विशेषत: अभंगवाङ्मयाचे मुद्रण करीत असताना भाषा–विशेषाकडे फारसे काटेकोरपणाने पाहण्यात येत नसावे अशी शंका घेण्यास बरीच जागा आहे. त्यामुळे आज उपलब्ध असलेल्या गाथ्यावरून पाहता तेराव्या शतकातील नामदेवांच्या अभंगाची भाषा व सतराव्या शतकातील तुकारामांच्या अभंगाची भाषा यात फारसा फरक आढळत नाही. उलट भाषेच्या या पुराव्यामुळेच नामदेव हे तेराव्या शतकातील नसून तदनंतरच्या काळात होऊन गेले असावेत असे अनुमान करण्याचा मोह अनेक अभ्यासकांना झालेला आहे, आणि तात्त्विक दृष्टीने पाहता त्यात बरेच तथ्य असल्याचे आढळेल. नामदेवांच्या अभंगांची फार जुनी अशी बाडे आज उपलब्ध नसतील म्हणूनहि असे झाले असण्याचा संभव आहे हे खरे, आणि म्हणूनच तर संतकवींच्या अभ्यासकांवर व विशेषत: संतांच्या अभंगांच्या गाथा प्रसिद्ध करणारांवर अशी जुनी बाडे शोधून काढण्याचा प्रयत्न करण्याची जबाबदारी विशेष येऊन पडते. गाथ्यातील मजकूर निश्चित होण्याच्या दृष्टीनेहि अशा संशोधनपूर्ण संपादनाची आज विशेष जरूरी आहे. याची कारणे अनेक आहेत. एक महत्त्वाचे कारण असे की एकाच नावाने अनेक संतकवि महाराष्ट्रात पुष्कळ झाले आहेत. ज्ञानदेव एक की दोन या वादाची येथे आठवण झाल्यावाचून राहणार नाही. या अनेकत्वाच्या वावटळीत 'नामदेव' देखील सापडले आहेत. 'नामदेव' नावाचे संत एकाहून अधिक झाल्याचे वाङ्मयेतिहासात नमूद आहे. विशेषत: विष्णुदास नामा आणि संत नामदेव यांच्या लेखनकर्तृत्वात बरीच सरमिसळ झाली आहे. म्हणजे असे की विष्णुदास नामाने लिहिलेले किती तरी अभंग आज नामदेवांच्या गाथ्यात सापडतात आणि यामुळे अनेक अनुमाने संभवतात. विष्णुदास नामाचे काही अभंग संत नामदेवांचेच आहेत असे गृहित धरून संत नामदेव हे आपल्या अभंगात आपले नाव 'नामा' आणि 'विष्णुदास नामा' या दोन्ही रीतींनी लिहीत, असे अनुमान कित्येकांनी केले आहे. याची सत्यासत्यता तपासून पाहायची असेल तर वर सांगितल्याप्रमाणे नामदेवांचा शक्य तितका अधिकृत गाथा संपादन करण्याचे प्रयत्न प्रथम व्हावयास पाहिजेत. एकाच नावाचे अनेक कवि होऊन गेल्यामुळेच नाही तर एका कवीच्या नावावर मागाहून कित्येकांनी नवीन अभंग रचून मूळ गाथ्यात घुसडले असण्याच्या संभवनीयतमुळेहि वर निर्देशिलेल्या प्रकारची अधिकृत संहिता तयार होणे आवश्यक ठरते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नामदेवांच्या ग्रंथाच्या बाबतीत तर मला त्याची अधिक आवश्यकता वाटते. कारण वारकरी पंथाच्या इतिहासात नामदेवांचे स्थान अनन्यसाधारण आहे. वारकरी पंथाचा पाया ज्ञानदेवांनी घातला असे समजण्यात येत असले तरी वस्तुस्थिति तशी नाही. ज्ञानदेवांच्याहि अगोदर हा पंथ अस्तित्वात होता. ज्ञानदेवांच्या काळात त्या पंथाच्या कार्याला भरघोस स्वरूप आले खरे; पण ते ज्ञानयुक्त भक्ति प्रतिपादणाऱ्या गूढवादी ज्ञानदेवांच्या उपदेशामुळे नाही तर सर्वसामान्य बहुजन समाजास पेलता येण्यासारख्या प्रेमळ भक्तीचा नामदेवांनी जो उपदेश केला आणि आपल्या कीर्तनांच्या साह्याने जो प्रचार केला त्यामुळे. ज्ञानदेवीकार ज्ञानेश्वरांचे विठ्ठलपंथानुयायित्व अमान्य करणाऱ्यांच्या दृष्टीने तर ही गोष्ट विशेषच महत्त्वाची होय. या प्रश्नांचा विचार संतांच्या अधिकृत संहितावाचून कसा करता येणार? नामदेवांच्या काळाचाहि प्रश्न काही संशोधकांनी आणि भाषाकोविदांनी गुंतागुंतीचा करून ठेवलेला आहे. त्यालाहि चोख उत्तर देण्याचे साधन म्हणून अशा संहितेचा उपयोग प्रामुख्याने होईल हे सांगायला नकोच. नामदेवांच्या अभंगांत 'संदीखाना' वगैरेसारखे शब्द मधून मधून येतात. तथापि नामदेवांच्या आयुष्याचा एकंदर काळ आणि त्यांच्या उत्तरायुष्यात दक्षिण महाराष्ट्रावर झालेले मुसलमानांचे आक्रमण लक्षात घेतले तर त्याबद्दल फारसे आश्चर्य वाटायला नको. नामदेव एक की अनेक, त्यांचा काळ कोणता वगैरे प्रश्नांचा निर्णय करण्यासाठी, सर्व प्रक्षेपादिकांचा विचार करून शुद्ध केलेली अधिकृत संहिता असणे अवश्य नाही काय? नामदेवांच्या अभंगांची अशी आवृत्ति तयार करण्याचे परिश्रम कुणी करील तर मराठी भाषा आणि वाङ्मयच नव्हे तर वारकरी पंथाचा आरंभ आणि महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास यावर त्याचे फार उपकार होतील.

तीर्थावळी आणि बाळक्रीडा

तीर्थावळीसंबंधाने असे निश्चित विधान करायला हरकत नाही की त्या वेळी वारकरी पंथाचे धुरीण म्हणून गाजलेल्या ज्ञानदेव-नामदेवांच्या दृष्टीकोणाचे प्रतिबिंब अगदी स्पष्टपणे दाखवणारा हा एक अत्यंत स्वच्छ असा आरसा आहे. या अभंगांना 'तीर्थावळी' असे नांव दिलेले असले तरी त्यात ज्ञानदेवनामदेवादि संतांनी केलेल्या तीर्थयात्रेचे नुसते वर्णन आहे असे नाही. त्यासाठी काय तीनचार अभंग खर्ची पडले असतील तेवढेच. पण या तीर्थयात्रेच्या प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही संतांच्या आध्यात्मिक दृष्टीकोनात आरंभी असलेले अंतर आणि नंतर त्यामध्ये झालेला समन्वय स्पष्ट करणे हाच त्यांचा मुख्य विषय ठरतो. आणि त्यावरून नामदेवाच्या कर्तृत्वाचे अचुक मोजमाप करणे केवळ शक्यच नाही तर सोपेहि होते.

या दृष्टीने आपण या तीर्थावळीकडे पाहिले तर काय दिसून येते? ज्ञानदेव हे भक्तिमार्गाचे पुरस्कर्ते होते यात शंकाच नाही. पण त्यांना नुसती भक्ति नको होती, ज्ञानयुक्त भक्ति पाहिजे होती. 'म्हणोनि भक्त एकु पाही। ज्ञानिया जो' (ज्ञाने ७-१०८) असा त्यांचा सिद्धांत होता. इतकेच नाही तर ही ज्ञानयुक्त भक्ति, आपापल्या वर्णानुसार प्राप्त झालेली कर्मे निमूटपणे आचरीतच करायची. जे का भक्ति पंथा बोटंगले' त्यांची वार्ता सांगतांना त्यांनी स्पष्टच म्हटले आहे की 'कर्मेंद्रिये सुखे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करीति कर्मे अशेखे । जिये का वर्णविशेखे । भोगाशि आली ॥ विधीते पाळीत । निषेधाते गाळीत । मज देऊनि जाळीत । कर्मफळे ' (१२–७६, ७७) अर्थात्, ज्ञानदेवांच्या ज्ञानी भक्ताने वर्णव्यवस्था व विधिनिषेध सर्व पाळले पाहिजेत,' असा त्यांचा आग्रह आहे. नामदेवराय हे आर्त भक्त होते. विषमतामूलक वर्णव्यवस्थेला व तदनुषंगिक विधिनिषेधांना ते कंटाळले होते. ' बहु अपराधी जाण यातिहीन । पतितपावन पांडुरंगा ' (चित्र. गाथा. ११७८); ' हीन दीन जाती मोरी पंढरीके राया । ऐसा तुमने नामा दरजी कायकू बनाया ' (१८६८); ' देवा मेरी हीन जाती हो । काहुपे सहीयत जाती हो ' (१९२४) हे व असेच इतर उद्गार काढण्याइतपत वर्णविषमतेच्या तीव्रतेचा त्यांना कटु अनुभव आला होता. ' तत्त्व पुसावया गेलो वेदज्ञासी । तव भरले त्यापाशी विधिनिषेध ॥ तया समाधान नुमजे कोणे काळी । अहंकार बळी झाला तेथे ' (१३३६). यावरून विधिनिषेधांचाहि त्यांना कंटाळा आला होता; नव्हे, त्यांच्यामुळे व्यर्थ अहंकार पुष्ट होऊन मनुष्य समाधानाला आणि परमेश्वराला आचवतो असे त्यांचे स्पष्ट मत दिसते. या सर्वांना कंटाळून ते परमेश्वरभजनाकडे वळले होते. आणि तेहि इतक्या आर्ततेने की त्यासमोर त्यांना दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींची पर्वा नव्हती. अशा आर्त भक्ताला तीर्थव्रतादिकांची आवश्यकता काय ?

पण ज्ञानदेव या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवणारे होते. ' जीवनमुक्त ज्ञानी जरी जाले पावन । तरि देवतातीर्थे भजन न सांडिती ' असे त्यांना वाटत होते. त्यांनी नामदेवाची मुद्दाम भेट घेऊन त्यांना तीर्थयात्रेला चालण्याविषयी आग्रह केला. परमेश्वराच्या आर्त भक्तीपुढे तीर्थयात्रादि तुच्छ होत असे अनुभवणाऱ्या नामदेवाला हे पसंत कसे पडणार ! म्हणून मोडकळीस आलेल्या ब्राह्मणधर्माची व तीर्थक्षेत्रादि व्रतांची प्रतिष्ठा पुन्हा स्थापन करण्याची ईर्षा बाळगणाऱ्या ज्ञानदेवांनी त्यांना परमेश्वरासमोर नेले. पण परमेश्वरांनी उलट ज्ञानदेवांनाच विचारले की " सहज तीर्थरूप तूंचि निरंतर । असता हा विचार काय करिसी ? " यावर ज्ञानदेव उत्तर काय देणार ? नामदेवांचे संगतिसुख घेण्याची आपली इच्छा आहे, म्हणून तरी त्याला आपल्याबरोबर पाठवावे अशी गळ घातल्यामुळे विठोबांनी नामदेवांना ज्ञानदेवाबरोबर पाठवले. पण त्यांचे मन नामदेवाच्या–या आर्त भक्ताच्या वियोगाने तळमळत होते. ' निडारले नयन स्वेदे भिजले वदन । हृदय झाले पूर्ण करुणारसे ' अशी त्यांची स्थिती झाली. बरें, इकडे ज्ञानदेवाबरोबर तीर्थयात्रा करीत असतांना नामदेवरायांना तरी सुख होत होते काय ? मुळीच नाही. त्या सगळ्या संतांच्या समुदायात असूनहि ' चिंतातूर थोर पडिलो ये परजनीं । न दिसे माझे कोणी जिवलग ' असे त्यांना वाटत होते. ' तूंचि माझे व्रत तूंचि माझे तीर्थ । तूंचि धर्म अर्थ कामदेवा ' असे मानणाऱ्या नामदेवरायांना भूतळावरील तीर्थक्षेत्रांच्या दर्शनाने आनंद कसा होणार ! मोक्षप्राप्तीसाठीहि यांची काही गरज नाही याची त्यांना जाणीव होती. ' यज्ञयाग दान व्रत उद्यापन । हे नेणे मी साधन काय करू ॥ जपतप होम स्वधर्म रक्षण । नव्हे तीर्थाटण काय करू ॥ ' (१२१९); ' न लगे करावे यज्ञयाग । न लगे आणिक मंत्रलाग । एक सेविलिया पांडुरंग । अनंत तीर्थे घडतील " (१७३०); ' तीर्थ करिसी तरी कापडीच होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ' (१५६५) अशी ज्यांची नितांत श्रद्धा, त्यांना ज्ञानदेवाबरोबर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

का होईना, केलेल्या तीर्थाटनापासून सुख नव्हते यात आश्चर्य नाही. प्रवासात वे नेहमी दुश्चित असत. त्यांना खंती वाटत असे. ती घालवण्यासाठी ज्ञानदेवांनी नामदेवांना पुष्कळ ब्रह्मज्ञान सांगितले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. मेघावाचून इतर कुणाकडेहि ढुंकून देखील न पाहणाऱ्या चातकाप्रमाणे पंढरिनाथाच्या ठिकाणी असलेला नामदेवाचा दृढ भाव पाहून ज्ञानदेव थक्क झाले आणि त्यांनी धन्योद्गार काढले. इतकेच नाही तर ज्ञानयुक्त भक्ति प्रतिपादन करणाऱ्या ज्ञानदेवांनी नामदेवांना त्यांच्या या भक्तीचे रहस्य विचारले आणि नामदेवांनी ते नम्रतापूर्वक विशद करून सांगितले. 'येर कर्म धर्म सर्वही पाल्हाळ । श्रमचि केवळ जाणिवेचा' (१४) केवळ ज्ञान, कर्म, धर्म ही व्यर्थ आहेत. विठोबाचे एकविध नामस्मरण हाच खरा मार्ग होय असा त्यांच्या प्रतिपादनाचा आशय होता आणि तो ज्ञानदेवांना पटला. त्यानंतरच्या प्रवासात सर्वजण पाण्यावाचून तडफडत असताना नामदेवाने केलेल्या धाव्यामुळे 'तव गडगडीत कूप उदके वोसंडला । कल्पांतीं खवळला सिंधु जैसा' हे पाहून तर ज्ञानदेवांचे अंतःकरण भरून आले; त्यांनी एकदम नामदेवांना आलिंगन दिले आणि स्पष्ट मान्य केले की 'तीर्थयात्रे जाणे काही न लगे करणे । ऐकुनी तुझे गाणे सुखरूप' आणि ही प्रचीति आणून देणाऱ्या नामदेवाच्या "चरणासी लागला ज्ञानदेव."

'ज्ञान'देवाच्या आणि 'नाम'देवाच्या मीलनाचा हा प्रसंग अत्यंत बहारीचा आहे. त्यात या दोन्ही पारमार्थिकांचा आध्यात्मिक दृष्टिकोन स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेला आहे. नामदेवांनी स्वीकारलेल्या, अनुभवलेल्या, प्रतिपादिलेल्या आणि प्रसृत केलेल्या 'नाम' भक्तीचे किंवा आर्त भक्तीचे माहात्म्य तर त्यावरून दिसून येतेच पण दुसऱ्याहि एका दृष्टीने हा प्रसंग महत्त्वाचा आहे. ज्ञानदेवाच्या पारमार्थिक विचारसरणीतील उत्क्रांतीची, विकासाची पुढील अवस्था यात स्पष्ट झालेली आहे, असे मला वाटते. भक्तिमार्गाचे प्रतिपादन करून, गीतेच्या आधारे, त्यांनी परमेश्वरप्राप्तीचे दरवाजे सर्व वर्णांना उघडे करून दिले हे खरे. पण त्यांचा विशेष भर 'ज्ञान'युक्त भक्तीवर होता. ही ज्ञानयुक्त भक्ती अज्ञानी भोळ्याभाबड्या लोकांना साधणार कशी? आणि अंतःकरणातील उत्कट भावाने जर ईश्वर मिळू शकतो तर त्यासाठी, मनुष्यमात्राच्या ठिकाणी आपल्या अस्तित्वानेहि अहंकार निर्माण करणाऱ्या ज्ञानाची आवश्यकता काय आहे? त्यासाठी अंतःकरणपूर्वक भक्तीची—आर्त भक्तीचीच आवश्यकता आहे. तेवढ्यानेहि ईश्वर सहज मिळू शकतो. हे रहस्य ज्ञानदेवांना तीर्थाटनात नामदेवांच्या संगतीने कळले आणि ते त्यांनी मान्य केले. यात त्यांच्या विचारसरणीचा विकास आहे.

तीर्थाटनात दुसरीहि एक गोष्ट ज्ञानदेवांना पटली. परमेश्वरप्राप्तीचा इतर साधनापेक्षा 'पथराज' भक्तीमार्गाचे प्रतिपादन करूनहि 'जिये यज्ञदानादि पायिके । इये कर्मे आवश्यके । तिये न संडावी पांथिके । पाउले जैसी' (ज्ञा. १९–१४९) या प्रमाणे यज्ञदानादिकांची आणि अर्थातच तीर्थक्षेत्रांचीहि आवश्यकता प्रतिपादन करणाऱ्या ज्ञानदेवावर तत्कालीन ब्राह्मणधर्माचा जबरदस्त पगडा होता असे स्पष्ट दिसते. नामदेवांनी यांची अनवश्यकता ठासून प्रतिपादन केली आहे. याला अनेक सामाजिक कारणे असू शकतील. त्यावेळच्या धर्मनिष्ठ ब्राह्मणांनी ज्ञानदेवांना उपनयना-

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चीहि परवानगी नाकारून त्यांचे ब्राह्मणत्व अमान्य केले असले तरी ज्ञानदेव मात्र स्वतःला त्याच वर्गाचे प्रतिनिधि समजत होते. त्या वेळचा ब्राह्मणवर्ग तीर्थक्षेत्रादिकासारख्या अनुत्पादक कर्मांत मग्न राहून आपला हा आचारधर्म इतरांवरहि लादीत होता. यातून बाहेर पडणे अत्यंत आवश्यक होते. ज्ञानदेव ते करू शकले नाहीत. आपल्या समाजाच्या रूढीची पकड त्यांच्यावर इतकी होती की तिच्यातून बाहेर पडणे त्यांना इष्टहि वाटले नाही आणि म्हणूनच 'जीवन्मुक्त ज्ञानी जरी जाले पावन। तरि देवता तीर्थभजन न संडिती ' असे त्यांनी म्हटले आहे. नामदेवांच्या भेटीला आले तेव्हा ज्ञानदेवांचे हे मत होते. पण तीर्थाटन करीत असतांना नामदेवांच्या बरोबर केलेल्या विचारविनिमयाने आणि अनुभवाने त्यांनी मान्य केले की 'तीर्थयात्रे जाणे काही न लगे करणे ' ज्ञानदेवांच्या विचारात झालेला हा दुसरा बदल होय, आणि हा घडवून आणण्याचे कार्य नामदेवांनी केले. समाजपुरुषाच्या पायात पडलेल्या तीर्थक्षेत्रादि व्रतांच्या रूढीच्या शृंखला तोडण्याचे धैर्य नामदेवांनी दाखवले.

नामदेव ज्या अब्राह्मण वर्गातून पुढे आले होते त्यांच्या आध्यात्मिक व सामाजिक गरजा लक्षात घेऊनच त्यांनी तीर्थक्षेत्रव्रतांच्या रूढीतून त्यांना सोडवण्याचा हा मार्ग स्वीकारला. त्याचा त्यांनी सर्वांना उपदेश केला इतकेच नाही तर तो त्यांनी स्वतः इतक्या निष्ठेने आचरला की त्यामुळे ज्ञानदेवांनाहि तो मान्य करणे भाग पडले. वारकरी पंथाचे नेतृत्व ज्ञानदेवापेक्षाहि नामदेवाकडे अधिक होते असे मला वाटते ते याचमुळे. आर्त भक्ताच्या ठिकाणी मागाहून ज्ञानियाची लक्षणे आपोआप उमटतात, त्याला द्वैताद्वैताचे ज्ञान नसताहि तो जगदात्म्याशी आणि त्याच्या जगद्रूप आविष्काराशी अद्वैतवृत्तीने तद्रूप होतो. याचे एक अतिशय सुंदर उदाहरण या तीर्थावळीत आढळते. तीर्थयात्रा करीत करीत ज्ञानदेव व नामदेव काशीला गेले. तेथे गंगेने ज्ञानेश्वराच्या पायाला मिठी मारली. ती सोडण्याचा आग्रह करीत असतांना नामदेवराय म्हणतात की ' नामा म्हणे सोडा बाई । ज्ञानदेव सर्वा ठायी ' यावरून याचे प्रत्यंतर येत नाही काय !

तीर्थावळीच्या पूर्वार्धात तीर्थक्षेत्रादि व्रतांची व्यर्थता व्यक्त झाली आहे तर उत्तरार्धात भक्तिक्षेत्रामध्ये वर्णाची किंवा जातींची समता सूचित झाली आहे. आणि यामुळे पूर्वार्धाप्रमाणेच हा उत्तरार्धहि फार महत्त्वाचा आहे. या सर्व प्रसंगात साकार परमेश्वराची म्हणजे विठोबाची भक्ति खेळवलेली असल्यामुळे त्याला पौराणिक चमत्काराचे स्वरूप आलेले आहे हे खरे. त्याकडे दुर्लक्ष करून त्यातील भावार्थ तेवढा आपण पाहू. तीर्थे करून आल्यावर व्रताचे उद्यापन म्हणून विठोबाने मावंदे करण्याचा बेत केला आणि त्यासाठी पंढरपुरातील सर्व ब्राह्मणांना जेवायला बोलावण्याचे ठरवले. विठ्ठल स्वतः यजमान झाले आणि त्यांनी सर्व संतांना बरोबर घेऊन क्षेत्रस्थ ब्राह्मणांना आमंत्रण केले. त्या कर्मठ आणि अभिमानी ब्राह्मणांनी विठोबाला त्याची कुळवृत्ति वगैरे विचारली. विठोबानेहि ती सांगितली. पण त्यावरून त्या ब्राह्मणांना विठोबाच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटू शकली नाही. तथापि त्याच्या वेषावरून तो ब्राह्मण असावा या कल्पनेने त्यांनी आमंत्रण स्वीकारले. त्याप्रमाणे जेवणेहि झाली. त्यानंतर ' तुमचे कृपादृष्टि करावे भोजन ' अशी आपली इच्छा असल्यामुळे आपण क्षणभर येथेच थांबावे अशी विठोबाने विनंती केली. ब्राह्मण थांबले. देवभक्तांच्या जेवणासाठी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ताट वाढले गेले. पण हे सर्व होत असतांना नामदेवराय भानावर होते कुठे ! आपल्याविषयीचे विठोबाचे प्रेम पाहून त्याचे देहभान हरपले होते आणि त्या स्थितीत ते महाद्वारावर उभे होते. हे लक्षात येताच विठोबांनी स्वत: धावत जाऊन, नामदेवांना आलिंगन देऊन उचलून आणले आणि आपल्या हाताने त्यांना, त्यांचा सुखसमाचार घेत घेत जेऊ घातले. त्यानंतर 'नामयाचे उच्छिष्ट स्वीकारिले देवे' ! आणि मग काय विचारता ! नामदेव हे जातीचे शिंपी आहेत हे ब्राह्मणांना ठाऊक होते. त्याचे उच्छिष्ट या यजमानाने खावे, म्हणजे काय ! याच्या ठिकाणी वर्णाश्रमधर्म मुळीच दिसत नाही ! एरवी या यजमान ब्राह्मणाने नामदेव शिंप्याचे उष्टे खाल्ले नसते ! वर्णाश्रम न पाळणाऱ्याकडे आपण जेवलो यात आपण फार मोठे पातक केले. आपले हे अपकृत्य लपवण्याचा ते बेत करू लागले. काहींनी तर असा तर्क केला की ज्याअर्थी नामदेवाचे उष्टे याने खाल्ले त्याअर्थी हा नामयाचा 'मायबाप' म्हणजे आईवडिलासारखा नातेवाईक, म्हणजे शिंपीच असला पाहिजे आणि याच्या घरी आपण जेवलो म्हणजे अब्राह्मणाच्या हातचे अन्न खाल्ले. तेव्हा याबद्दल आपणच प्रायश्चित्त घेतले पाहिजे. या विचाराने ते ब्राह्मण तेथून निघाले. त्यांची ती कोमेजलेली तोंडे पाहून विठोबांनी चौकशी केली तेव्हा ते स्पष्ट म्हणाले की "जातीचे ते शिंपी विश्व जाणे याते ! प्रत्यक्ष सांगाते जेवविले" इतकेच नाही तर 'उच्छिष्ट निजमुखे स्वीकारले यांचे !' यावरून तुमच्या ठिकाणी काहीच क्रियाकर्म नाही, वर्णाश्रमधर्म नाही, तुम्ही सगळा धर्म बुडविला ! तुम्ही आहात तरी कोण ! 'काय तुमचा नामा अंगभूत ! ' नामदेव काय तुमचा नातेवाईक आहे, की काय ! तसे असले तर तुम्ही आम्हाला अवडंबर करून चांगलेच फसवले ! कारण तुमच्या वेषावरून आम्ही तुम्हाला ब्राह्मणच समजलो !" यावर विठोबाने त्यांना चांगले उत्तर देऊन 'तुम्ही वेदवक्ते असून तुमचा भेदभ्रम अजून मावळलेला नाही' असे सांगितले. इतकेच नाही तर जेवायला आरंभ करताना तुम्ही या गोष्टीची विचारणा का केली नाही, असा टोमणाहि मारला. तथापि आपल्या समन्वयाच्या दृष्टीने विठोबाने प्रायश्चित्त घेण्याची तयारी दाखवली. पण तत्पूर्वी त्यांनी स्पष्ट सांगितले "काम, क्रोध दूर सारून या नामदेवाने आपल्या अंतःकरणात मला साठवून ठेवले असल्यामुळे मी त्याच्या उच्छिष्टाचा अधिकारी आहे. माझ्या भक्तांना मी देवासारखे पूज्य मानतो", इतके सांगितले तरी त्या कर्मठ ब्राह्मणांना उमज पडेना. "प्रतिपादले वेदी जे जे धर्म । ते ते आचरावे विहित क्रिया कर्म । जे जे वर्णाश्रमे आले जया' असा उपदेश त्यांनी विठ्ठलाला केला. इतकेच नाही तर 'आचार प्रथम ब्राह्मणाचा धर्म' असे म्हणून त्याला ब्राह्मण धर्महि शिकविले ! त्यांनी विठ्ठलाला प्रायश्चित्त घ्यायला सांगितले. त्याप्रमाणे विठ्ठलाने ते घेतलेहि. प्रत्यक्ष परमेश्वराने घेतलेल्या या प्रायश्चित्तावर राही आणि रुक्माई, सत्यभामा आणि नारद व रुक्माई आणि विठ्ठल यांच्यामध्ये संवाद झाले. त्यातून रुक्मिणी, नारद आणि विठ्ठल यांनी भक्तिप्रेमाचे रहस्य अतिशय उत्तम रीतीने उकलून दाखविले आहे. रुक्मिणीने सांगितले की, प्रत्यक्ष परमेश्वरानेहि प्रायश्चित्त घेतले याचे कारण त्याचे नामदेवाच्या म्हणजे आपल्या भक्तांच्या ठिकाणी असलेले प्रेम. भक्तांच्या प्रेमासाठी परमेश्वर काय करायचे शिल्लक ठेवतो ! लोकलाज देखील तो बाळगीत नाही. इतकेच काय पण " न पाहे तयाचे जाति कुळ धर्म । वर्णाश्रमधर्म

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शुद्ध वाणी " भक्त आपणाला किती आवडतात याचे विठ्ठलाने केलेले वर्णन अतिशय बहारीचे आहे. ते मूळातच संपूर्ण वाचावे.

तीर्थयात्रेनंतर केलेले मावंदे व त्यांतून निर्माण झालेला हा प्रायश्चित्ताचा प्रसंग अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. भक्तिप्रेमाचे सर्वश्रेष्ठत्व व भक्ताचे परमेश्वरप्रियत्व हे त्यांतील मुख्य प्रतिपाद्य आहे यात शंकाच नाही. पण त्याच्याच अनुषंगाने इतर काही गोष्टींवरहि महत्त्वाचा प्रकाश पडतो. मावंद्यासाठी आलेल्या ब्राह्मणांचा कर्मठपणा आणि अहंकार, त्यांची भेदबुद्धी आणि जातिकुळाचा अभिमान यांचा त्यात बारंवार उल्लेख आलेला आहे. अशा ब्राह्मणांना 'त्या कैचे चरण प्राप्त तुमचे' असे म्हणून रुक्मिणीने त्यांना परमेश्वर प्राप्त होऊ शकत नाही हेच सुचविले आहे. पण एवढ्याने संपले असे नाही. या ब्राह्मणांचा 'वर्णाश्रमापरत्वे बोलिले जे धर्म। ते ते विहित कर्म आचरावे' असा आग्रह होता. त्यांच्या मनाचे समाधान व्हावे म्हणून विठ्ठलाने प्रायश्चित्त घेण्याचे 'नाटक' करून वर्णाश्रमधर्माला मान दिल्यासारखे दाखवले हे खरे! पण रुक्मिणीच्या म्हणण्याप्रमाणे पाहिले तर त्याने हे प्रायश्चित्ताचे 'नाटक' फक्त भक्तप्रेमामुळे केले; मनापासून नाही! त्याचे अंतःकरण त्याच्या कृतींत व्यक्त झाले आहे. आणि ही वृत्ति काय सुचवते? हेच नाही का, की भक्तीच्या क्षेत्रांत जातिकुळाची परमेश्वर पर्वा करीत नाही. आपला भक्त कोणत्याहि जातीतला असला तरी तो त्याला वंद्य वाटतो. त्याच्या बरोबर भोजन करणे, इतकेच नाही तर त्याचे उच्छिष्ट भक्षण करणे देखील त्याला आवडते. हे करणे कदाचित वर्णाश्रमधर्माविरुद्ध असेल; नव्हे, आहे असे गृहीत धरले तरी परमेश्वर तेहि करतो. याचा अर्थच हा की भक्तीच्या क्षेत्रात त्याला वर्णाश्रमधर्म मुळीच मान्य नाहीत.

आणि ही गोष्ट आपल्या कृतीने अधिक स्पष्ट करण्यासाठीच की काय पण चंद्रभागेवर केलेला संकल्प पूर्ण करण्याच्या निमित्ताने विठ्ठलाने क्षेत्रवासी ब्राह्मणांना पुन्हा भोजनाला बोलावले. यात 'पुढती कौतुक करणे तुजलागी' हाच विठ्ठलाचा हेतु आहे, हे नामदेवाने ओळखले होते. रुक्मिणीला देखील 'आजिचे कौतुक पहा अभिनव' असे ते आरंभी म्हणाले. विठ्ठलाने केलेले हे कौतुक कोणते? रुक्मिणीला त्यांनी ते आधीच सांगितले की 'अवघे संतजन आमुचे सांगाती। जेवू एका पंक्ती सरीसे आम्ही' सर्व भक्त, मग ते कोणीहि असोत, कोणत्याहि जातीचे असोत, सारखेच आहेत. आम्ही सर्वजण मिळून आज एका पंगतीत जेऊ. अनेक जातीच्या लोकांनी एका पंगतीत जेवणे हे वर्णाश्रमधर्माविरुद्ध होते, आणि तरीहि विठ्ठलाला तो सोहळा क्षेत्रस्थ ब्राह्मणांना दाखवायचा होता. यातला हेतु आता पुन्हा स्पष्ट करायला पाहिजे असे नाही. आमंत्रणाप्रमाणे क्षेत्रस्थ ब्राह्मण आले, त्यांनी भोजन केले आणि नंतर मग संतांची पंगत बसली. तिच्यात कोण कोण होते? निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, सांवता माळी, जगमित्र, अंबंद, सुदामा, नरहरी सोनार हे तर होतेच पण शिवाय चोखा आणि बंका महार, गोरा कुंभार हेहि होते. म्हणजे महार, कुंभार, सोनार, माळी, ब्राह्मण वगैरे सर्व जातीचे भक्त एका पंगतीत होते. विठ्ठलाने त्या सर्वांची पूजा केली, तुळशीमाळा त्यांच्या गळ्यात घातल्या आणि मग सर्वांना त्याने आपल्या हाताने जेऊ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घातले. 'सकळा मुखी कवळ देतसे निज करे। उच्छिष्ट पीतांबरे सावरी तो' हा पंगतीचा अवसर पाहताच क्षेत्रस्थ ब्राह्मणांचे डोळे उघडले. त्यांनी ओळखले की हा यजमान म्हणजे 'पांडुरंग साच.' त्याच्याकडून होत असलेला भक्ताचा आणि भक्तीचा गौरव पाहून त्या ब्राह्मणांचा अहंकार गळाला. विठ्ठलाने मग कृष्णावतारीचे आपले रूप धारण केले आणि भक्तांबरोबर प्रेमसुखाचा सोहळा अनुभवला, आणि ब्राह्मणांशी सुखगोष्टी करण्याच्या निमित्ताने आपल्या सर्व भक्तांचे कोडकौतुक केले. ते ऐकून ब्राह्मणांनी म्हटले "वेदशास्त्रपठने बहिर्मुख जनें। केली अभिमाने छळण बुद्धि। धिक् ते जाणपण" "कुळाचेनि अभिमाने अंतरलो गा तेणे" आता यापुढे तुझ्या या भक्तांची सेवा "हेचि व्रततीर्थ क्रियाकर्म आम्हा" ब्राह्मणांचे झालेले हे परिवर्तन वेदशास्त्राचे ज्ञान, जातिकुळाभिमान, तीर्थव्रते इत्यादिकांची निरर्थकताच दाखवीत नाही काय? या सूचित भावार्थावर ज्ञानदेवांनी "न लगे तीर्थाटन कायाक्लेश जाण। नलगे अनुष्ठान करणे बहु। न लगती सायास करणे उपवास॥" इत्यादि शब्दात या भक्तिमार्गाचे रहस्य आपल्या तोंडून स्पष्ट केले. तीर्थाटनादिकांच्या निरर्थकतेसंबंधी ज्ञानदेवांनी काढलेला हा पुनरुद्गार त्यांच्या मतात झालेला फरक निःसंदिग्ध रीतीने स्पष्ट करतो. अनेक जातींचे एका पंक्तीतील भोजन ज्ञानदेवांनी पाहिले. इतकेच नाही तर त्यात ते स्वतः जेवले यावरून वर्णविषमताहि त्यांनी अमान्य केली हे स्पष्ट होत नाही काय? या सर्व गोष्टी पढून पंढरपूर येथील क्षेत्रस्थ ब्राह्मणांचीहि शरणागति दाखवून त्यांचेहि मतपरिवर्तन झालेले स्पष्ट केले आहे. सारांश, नामदेवांनी तीर्थाटनाविरुद्ध आणि विषमतेविरुद्ध जो बंडाचा झेंडा उभारला होता त्याखाली इतर सर्व शूद्र मंडळीबरोबर ज्ञानदेवादि संत आणि पंढरपूरनिवासी ब्राह्मण हेहि गोळा झाल्याचे मोठे मनोहर दृश्य तीर्थावळीत नामदेवांनी दाखवले आहे आणि हेच तीर्थावळी प्रकरणाचे रहस्य आहे. भक्तीचे सर्वश्रेष्ठत्व, भक्ताचे व देवाचे परस्परावरील निर्व्याज प्रेम यांच्या पार्श्वभूमीवर वारकरी पंथांतील या दोन सामाजिक क्रांतींचे दिग्दर्शन हलुवार रीतीने करताना नामदेवांनी मनाचा जो समतोलपणा आणि निराग्रहीपणा दाखविला आहे त्याची गोडी काही विशेष आहे. त्यामुळेच वारकरी पंथाचे नेतृत्व करणाऱ्या नामदेवरायांनी आरंभिलेल्या रूढिभंजक आणि समताप्रस्थापक कार्याचा परिणामकारक ठसा वाचकांच्या आणि श्रोत्यांच्या मनावर उमटतो.

या तीर्थयात्रेच्या प्रसंगावरून नामदेवांच्या आयुष्यातील दुसऱ्या एका प्रसंगावर फार महत्त्वाचा प्रकाश पडतो. ज्ञानदेवांनी तीर्थयात्रा करण्यापूर्वीच ज्ञानदेवी लिहिली होती. त्यामुळे हिंदुस्थानचे भ्रमण करून आलेल्या अनुभवांची बैठक ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाला आहे असे म्हणता येत नाही. नामदेवांच्या बाबतीत मात्र तसे नाही. या तीर्थयात्रेत पुण्य जोडण्याचा नामदेवांचा हेतु नव्हता हे तर खरेच. पण या निमित्ताने झालेल्या भ्रमणात त्यांना आपल्या देशाची, विशेषतः उत्तर हिंदुस्थानची दर्कदर परिस्थिति अवलोकन करता आली यात शंका नाही. त्यांच्या अवलोकनातून अविंधांनी हिंदु धर्मावर चालवलेले आक्रमण सुटले असेल हे शक्य वाटत नाही. हे आक्रमण थोपवून धरण्याची आवश्यकता त्यांना वाटली असली पाहिजे आणि त्यामुळेच आपल्या उत्तर आयुष्यात उत्तर हिंदुस्थानातील

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पंजाब प्रांतात जाऊन त्यांनी आपले धर्मसंस्थापनेचे कार्य केलेले दिसते. आलेल्या अनुभवातून स्फूर्ति घेऊन कार्य करणारे ते कृतिवीर संत होते आणि म्हणूनच आपल्या परमप्रिय पंढरपुराचा परित्याग करून त्यांनी आपले उत्तर आयुष्य पंजाबात घालवले. तेथील लोकांना धर्मप्रवण करून इस्लाम धर्माच्या आक्रमणाला थोपवून धरले. पंढरपूरच्या विठोबांचे ते अनन्यभक्त असल्यामुळे त्यांनी हीच विठोबाची भक्ति पंजाबात न्यावी यांत आश्चर्य नाही. त्यांच्या नावाने तिकडे एक स्वतंत्र पंथ स्थापन झालेला आहे आणि तो अजूनहि विद्यमान आहे. नामदेवरायांच्या कीर्तीची ती उज्ज्वल पताकाच नव्हे काय ? तेथे असतांना त्यांनी काव्यरचनाहि केली. तिच्यांतील काही भाग शिखांच्या ग्रंथसाहेबात समाविष्ट करण्यात आलेला आढळतो. याचा अर्थच असा की नामदेवरायांच्या व्यक्तित्वाची आणि कर्तृत्वाची छाप केवळ तेथील हिंदूंवरच नव्हे तर शिखांवर देखील पडलेली होती. त्यांच्या कार्याच्या थोरवीचे हे एक उत्तम निदर्शक होय. उत्तर हिंदुस्थानात जाऊन भक्ति-संप्रदायाचा प्रचार करण्याचे त्यांचे हे धार्मिक कार्य पाहिले म्हणजे त्यांच्या विशाल अन्तःकरणाची, विस्तृत कर्तव्यक्षेत्राची आणि व्यापक कृतिशीलतेची यथार्थ कल्पना येते. महाराष्ट्राबाहेर जाऊन मराठी दैवतांची आणि मराठी भाषेची कीर्ति पसरवणारे नामदेव हे पहिलेच संत आहेत. त्यांनी मराठी भाषेची कीर्ति तिकडे पसरविली. कारण, त्यांच्या तेथील काव्यातून अनेक मराठी शब्द आणि व्याकरणरूपे विखुरलेली आढळतात. त्यांचे हे कार्य नामदेवसंप्रदायालाच नव्हे तर अखिल महाराष्ट्राला भूषणभूत होऊन राहिले आहे यात शंका नाही. या कार्याचे स्फूर्तिस्थान तीर्थावळीत आहे. सहाशे वर्षांपूर्वी नामदेवराय पंजाबात गेले आणि त्यांनी तेथील हिंदूंना त्यांच्या धर्मसंकटात साह्य केले. हे 'राष्ट्रीय' एकीकरणाचे कार्य एका 'महाराष्ट्रीय' संताने केले ही किती अभिमानाची गोष्ट आहे ! उत्तर हिंदुस्थानातील जनता धर्मसंकटात असतांना त्यांच्या साह्यार्थ महाराष्ट्रीय वीर धावून गेल्याची अनेक उदाहरणे इतिहासात आहेत. त्या वीरांना मार्ग दाखवण्याचे कार्य नामदेवांनी कितीतरी शतके अगोदर करून ठेवले होते ! दुर्दैवाने पाकिस्तानच्या निर्मितीमुळे अशाच दुसऱ्या धर्मसंकटात पंजाबातील जनता आज सापडलेली आहे. तेथे झालेल्या अविंधांच्या आक्रमणामुळे तेथील हीनदीन जनता आज नामदेवरायांच्या पवित्र महाराष्ट्र भूमीकडे धाव घेत आहे. त्यांना याहि वेळेला आश्रय देऊन व साह्य करून आत्मसात् करून घेण्याचे कार्य महाराष्ट्र जनतेने करणे हे तिचे कर्तव्यकर्म नाही काय ! नामदेवरायांच्या नावाची विरुदे मिरविणाऱ्या सांप्रदायिकांनी या बाबतीत पुढाकार घेणे प्रसंगोचित होईल. जनताजनार्दनाच्या रूपाने महाराष्ट्रातील घराघरातून असलेली विठ्ठलमूर्ति त्यांना आपल्या भक्तिप्रेमाचा अनुभव आणून देईल तर देशाच्या दृष्टीने किती बहार होईल !

'तीर्थावळीतील' ही भक्तिप्रेम-रहस्याची पार्श्वभूमि लक्षात घेतली म्हणजे या ग्रंथातील 'बाळक्रीडे'चे रहस्यहि सहज लक्षात येईल. श्रीकृष्णाचे सर्वच चरित्र आणि विशेषत: त्याची बाळक्रीडा भक्तीचे श्रेष्ठत्व उकलून दाखविणारी आहे. भक्तांची छळणा करणाऱ्या अभक्तांचा नाश करून गोपगोपींना त्याने आपले प्रेम मुक्तहस्ताने वाटले. यांची अनेक उदाहरणे 'बाळक्रीडेत' आहेत. या दोन्ही प्रकरणात देवभक्तांचे प्रेम अत्यंत सरसतेने वर्णिलेले आढळते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतकेच नाही तर सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास त्यात साम्यविरोधाची मोठी सुंदर चित्रे पाहावयास सापडतात. तीर्थावळीत तीर्थक्षेत्रादि व्रतांची अनावश्यकता सांगितली आहे. तर बाळक्रीडेत चंपाषष्ठी, संकष्टचतुर्थी इत्यादि व्रतांचा श्रीकृष्णाने आपल्या कृतींनी उपहासच केलेला आहे. नामदेवादि भक्तांवरील विठोबाच्या निरतिशय प्रेमाचा देखावा तीर्थावळीत आढळतो तर गोपगोपिकांवरील श्रीकृष्णाच्या अव्याज प्रेमाचे दर्शन बाळक्रीडेत घडते. भक्तावर प्रेम करताना विठोबा " न पाहे तयाचे जाती कुळ धर्म। वर्णाश्रम धर्म शुद्ध बाणी " तर गोपबाळकांबरोबर खेळतांना श्रीकृष्णाहि " विचारिता याति कुळ अमंगळ। न विचारी काळ वेळ घावे " ज्ञानदेव नामदेवांना घेऊन गेल्यामुळे विरहार्त झालेल्या विठ्ठलाचे दर्शन ' तीर्थावळीत ' घडते तर अक्रूराबरोबर जात असताना गोपगोपिकांच्या विरहाने दु:खी झालेल्या श्रीकृष्णाचे दर्शन ' बाळक्रीडेत ' होते. पहिलीत विठ्ठलाच्या वियोगाने तळमळणारा नामदेव भक्त पाहावयास सापडतो तर दुसरीत श्रीकृष्णाच्या विरहाने प्राण पाखडणाऱ्या गोपी दिसतात. आपल्या भक्ताचे दु:ख निवारण्यासाठी विठोबाने ज्ञानदेवाला सांगितलेले असते तर ' जीवनावीण मत्स्य जैसे ' तळमळणाऱ्या गोपगोपींच्या सांतवनासाठी श्रीकृष्णाने उद्धवाला पाठवलेले आहे. सारांश, या दोन्ही प्रकरणांत देवभक्तांच्या परस्परावरील प्रेम-सागरावर उचंबळणाऱ्या भावलहरीबरोबर वाचकाचे अंत:करण एकसारखे आंदोलन पावत राहते. आधीच प्रसंग रसाळ आणि त्यात नामदेवासारखा प्रेमळ आणि आर्त भक्त त्याचे वर्णन करणारा, तेव्हा भक्तिभावाची काव्यगंगा दुथडी वाहू लागल्यास आश्चर्य नाही.

*

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाट्याचार्य देवल

द. रा. गोमकाळे

★

मराठी रंगभूमीच्या उत्कर्षाचा पूर्वकाळ आठवला म्हणजे आजहि ज्या थोड्या व्यक्तींची कृतज्ञभावाने प्रथम आठवण येते अशा व्यक्तींत नाट्याचार्य देवल यांची गणना प्रामुख्याने करावी लागते. मराठी रंगभूमीवरील संगीत व गद्य नाट्यपरंपरा दोन्हींहि देवलांच्या ऋणाईत आहेत. नट, नाटककार आणि नाट्यशिक्षक या तिन्ही क्षेत्रांतील त्यांचें कार्य मराठी रंगभूमीच्या इतिहासांत अपूर्व असेंच आहे. विद्यमानच नव्हे तर गेल्या ५० वर्षांत गाजलेल्या अनेक नटांना ते गुरुस्थानीं आहेत. किंबहुना मराठी रंगभूमीवर गाजलेल्या सर्व नाटककारांत निसर्गत: नाट्यगुण ज्यांच्यांत वसत होते आणि नाट्य हेच ज्यांनी बहुतांशाने आपले जीवन-सर्वस्व बनविलें होतें अशी एकुलती एक व्यक्ति म्हणजे नाट्याचार्य देवल असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाही. देवलांचे गुरु अण्णा किर्लोस्कर यांच्या बाबतींतहि तसेंच म्हणतां येण्यासारखें आहे. नव्हे, नट, नाटककार यापेक्षाहि नाटककारसंघटक या दृष्टीने अण्णांची थोरवी अधिक असली तरी अवघ्या ५ वर्षांचें नाट्यजीवनच अण्णांना लाभल्यामुळे त्यांनी चालविलेल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवण्यापलीकडे ते फारसें अधिक करूं शकले नाहीत. आजच्या संगीत नाट्यपरंपरेची अण्णांनी प्रस्थापना केली. तिला अधिक भरदार, प्रतिष्ठित आणि सुशिक्षित केलें. तिला भरदार पायावर उभी केली. तिला अभिजात केलें आणि समाज आणि नाट्यकला या दोहोंत परिस्थितिपरत्वें निर्माण झालेला परकेपणाचा पातळ पडदा काढून टाकला. तो पडदा दूर होतांच समाजांत या कले-विषयी आत्मीयता आणि आस्था निर्माण झाली— आणि मराठी रंगभूमीचा अपूर्व असा उत्कर्ष साध्य झाला.

अण्णांची ही परंपरा, १८८५ सालीं, म्हणजे किर्लोस्कर मंडळीची स्थापना होऊन अवघ्या पांचच वर्षांनी अण्णांचें देहावसान झाल्यामुळे, खंडित न होऊं देतां तिची योग्य जोपासना करण्याचें महत्त्वाचें कार्य देवलांनी केलें. अण्णांच्या ठायी आपला सद्भाव त्यांनी 'मृच्छकटिकां'त व्यक्त केला. एवढेंच नव्हे तर त्यानंतर 'शारदें'त देखील 'शंकर पद वंदि आधी। मग नत बलवंत पदीं॥' असें म्हटलें आहे तर 'संशयकल्लोळ' संगीत करतांना 'बलवत्पदनत गोविंदानें संगीतीं नटविलें'. शेवट-पर्यंत देवलांनी अण्णांच्या ठायीं आपला भक्तिभाव व्यक्त करून आयुष्याच्या शेवटा-पर्यंत अण्णांच्या परंपरेलाच ते चिकटून राहिले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वास्तविक नाट्याचार्य देवल यांच्याकडे गद्यपरंपरेचें जनकत्व जातें. १८४३ सालीं मराठी नाट्यकलेची गुप्तगंगा विष्णुदास भाव्यांच्या नवनाट्याच्या रूपाने महाराष्ट्रांत प्रगट झाली. ती प्रगट झाली ती संगीताच्या रूपाने. अण्णांचीं संगीत नाटकें आणि भाव्यांचीं नाटकें यांत पुष्कळच तफावत असली तरी मराठी नाट्यकलेची संगीतपरंपरा १८४३ इतकी जुनी आहे. त्या मानाने मराठी रंगभुमीवरील गद्यपरंपरा ३०-३५ वर्षांनंतरची आहे. गद्यपरंपरेच्या जन्मकाळापर्यंत तरी या दोन परंपरेंत एक महत्त्वाचा फरक आहे. गद्य नाटकांची परंपरा सुशिक्षितांनी निर्माण केली; तर संगीत नाटकांची परंपरा-निदान किर्लोस्कर मंडळीच्या स्थापनेपर्यंत तरी-अशिक्षित अशा लोकांच्या हातांत होती. भाव्यांनी जन्मास आणलेली संगीताची परंपरा अशिक्षितांच्याच हातीं राहिली कारण, ‘ नाटक्याचें तोंड पाहूं नये ’ ही परंपरेने चालत आलेली समजूत समाजांत त्या वेळीं प्रचलित होती. पण पाश्चात्य ज्ञानभांडार जसजसें खुलें होत गेलें, संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास जसजसा वाढीला लागला तसतसें सुशिक्षितांचें लक्ष या अभिजात कलेकडे वळलें, आणि शेक्सपियर, मोलीअर, शेरीडन आदि पाश्चात्य आणि कालिदास, भवभूति, शूद्रक आदि संस्कृत नाटककारांच्या नाटकांचीं भाषांतरें किंवा रूपांतरें करण्यांत आलीं. स्वतंत्र नाटककार म्हणून त्या काळीं कीर्तनाचाच काय तो अपवाद म्हणतां येईल. त्या काळीं या नाटकांना ‘ बुकीश ’ नाटकें म्हणत. या नाटकांचे प्रयोग करणारी आर्योद्धारक नाटक मंडळी प्रामुख्याने होती. तींत कै. पाटकर आणि देवल यांचेंच कर्तृत्व असल्यामुळे या परंपरेच्या जनकत्वाचा मान देवलांकडे जातो.

परंतु १८८० सालीं किर्लोस्कर मंडळीची स्थापना झाली. त्याच वर्षी देवलांचें ‘ दुर्गा ’ नाटक प्रसिद्ध होऊन त्याला पारितोषिकहि मिळालें. देवल आणि नाट्य ही गोष्ट समीकरणात्मक होती. त्यांचा आत्मा कवीचा होता. वृत्ति पूर्णतया नाट्यच होती. अण्णा त्यांना गुरुस्थानीं होते. अण्णांच्या अपूर्व यशामुळे त्यांचा कवीचा आत्मा किर्लोस्करांच्या परंपरेकडे साहजिकच ओढला गेला आणि संगीतपरंपरेंत तो १८८५ नंतर कायमचा विलीन झाला.

नट म्हणून देवलांचें कार्य आर्योद्धारक मंडळींत असतांच नांवारूपास आलें होतें. त्यानंतरचें त्यांचें सारें कार्य नाटककार आणि नाट्यशिक्षक म्हणूनच झालें. अण्णांच्या अडीच नाटकांवर किर्लोस्कर नाटक मंडळीचें अधिक चालणार नाही हें दिसून येतांच त्यांनी ‘ मृच्छकटिक ’ आणि ‘ शापसंभ्रम ’ हीं नाटकें लिहिलीं आणि आपलें सारें कौशल्य खर्चून तीं मनासारखीं, किर्लोस्कर नाटक मंडळींतील भाऊराव कोल्हटकर आदि नटांकडून बसवून घेतलीं. भाऊरावांच्या मृत्युनंतर किर्लोस्कर मंडळीवर नायकाच्या अभावीं फारच पेचप्रसंग निर्माण झाला. अशा वेळीं ते किर्लोस्कर मंडळीच्या मदतीस धाऊन आले. गोऱ्यांनी किर्लोस्कर मंडळी सोडून ‘ स्वदेशहितचिंतक ’ गाठली. त्याहि प्रसंगीं किर्लोस्कर नाटकमंडळीवर असाच कठिण प्रसंग आला होता. बालगंधर्वांची जोड त्या वेळीं किर्लोस्कर कंपनीला लाभली. त्या वेळीं—देखील ‘ शारदे ’ तील नटीची भूमिका केवळ चाचणीदाखल बालगंधर्वांकडून बसवून घेण्यापासून गोरे करीत असलेल्या नायिकेच्या सर्व भूमिका बालगंधर्वांना बसवून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देण्याचें महत्त्वाचें कार्य देवलांनीच केलें. किर्लोस्कर मंडळींत फूट पडून गंधर्व नाटक मंडळीची स्थापना होतांच गंधर्व, बोडसांनी देवलांचीच कास धरली आणि त्याहि वेळीं देवलांनी सर्व नटांना परिश्रमपूर्वक भूमिका बसवून दिल्या. खास गंधर्वांसाठी गद्य 'फाल्गुनरावा'ला 'संशयकल्लोळा' चा संगीत पेहेराव चढवून अत्यंत नाविन्य-पूर्ण पद्धतीने तें नाटक गंधर्वांना बसवून दिलें. सारांश अण्णांच्या मृत्यूनंतर त्यांच्या परंपरेची जोपासना आणि उत्कर्ष साधण्यासाठी देवलांनी अत्यंत आत्मीयतेने कष्ट घेतले.

गद्यपरंपरेचा हा जनक एकाएकी त्या परंपरेला सोडून संगीत परंपरेला कायमचा चिकटला याबद्दल कुणालाहि आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. कारण गद्य आणि संगीत असा नाटकांच्या बाबतींत कृत्रिम भेद ते मानीत नसत. नाटक गद्य असो वा पद्य असो त्यात नाट्य ही एकमेव प्रधान गोष्ट आहे हें सत्य त्यांनी पूर्णपणें आत्मसात् केलें होतें. नाटककारांच्या भावना व हेतु प्रेक्षकांच्या गळीं उतरविण्याचें एकमेव माध्यम म्हणजे नट हीच त्यांची कल्पना होती. लेखकाचें मनोगत प्रेक्षकांच्या गळीं उतरविण्याचें भाषा हें साधन आहे. नट ती भाषा जितकी स्पष्टपणें आणि भावनोत्कटतेने उपयोगांत आणील तितकें नाटककाराचें मनोगत प्रेक्षकांना स्पष्टपणें कळूं शकेल. वेगवेगळ्या भावना व्यक्त करण्याकरिता अभिनयाची, हाव-भावांची जितकी जरूर आहे तितकीच ज्या शब्दांच्या द्वारां ते भाव प्रगटपणें व्यक्त केले जातात त्या शब्दांच्या स्पष्ट आणि भावनांदोलित उच्चारांचीहि जरूर आहे. संगीतांत जी लयबद्धता-स्वरांचा चढउतार आहे तशीच हुबेहुब लयबद्धता आणि स्वरांचा चढउतार गद्यांतहि आहे. लेखकाचा आशय भाषेच्या द्वारें व्यक्त करतांना कोणत्या शब्दावर किती जोर द्यावयाचा— भूमिकेला अनुसरून नटाची हालचाल यथातथ्य व नैसर्गिक व प्रत्यक्षाशीं सदृश कशी असावी, या सर्व गोष्टी साध्य होण्या-करिता नटाला त्याची भूमिका नीटपणें कशी समजावून द्यावी याचें पूर्ण कसब त्यांना अवगत होतें. रंगभूमीवर येणाऱ्या पात्राच्या हालचालीपासून तों प्रत्येक शब्दाच्या उच्चारापर्यंत ते कटाक्षाने लक्ष देत असत. म्हणूनच बोडस, बालगंधर्व आदि उच्च श्रेणींतील नटांनी आपल्या उत्कर्षकाळांत देखील देवलांच्या शिक्षणाची अपेक्षा केली.

परंतु नाट्यशिक्षक म्हणून देवलांचें कार्य महत्त्वाचें असलें तरी त्याहिपेक्षा किती तरी पटीने अधिक महत्त्वाचें कार्य नाटककार म्हणून त्यांनी गाजविलें. दुर्गा, झुंजारराव, विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक, फाल्गुनराव, शापसंभ्रम आणि शारदा हीं त्यांचीं नाटकें होत. यांत 'शारदा नाटकाचा अपवाद वगळला तर बाकीचीं सारीं नाटकें भाषांतरित वा रूपांतरित अशीं आहेत. या नाटकांत त्यांचीं 'मृच्छकटिक,' 'संशयकल्लोळ' व 'शारदा' हीं तीन नाटकें तर मराठी नाट्यसृष्टीचा प्राण आहेत. त्यांचीं बहुतेक सारीं नाटकें भाषांतरित आहेत, स्वतंत्र नाहीत असा एक वादाचा मुद्दा कोल्हटकरांनी देवलांच्या विरुद्ध काढून त्यांना कमी लेखण्याचा प्रयत्न केला होता. शापसंभ्रमावरील टीकेंत त्याच कोल्हटकरांनी— 'जर रंगभूमीवर आणण्यास अपात्र असें एखादें नाटक जगांत असेल तर तें 'शापसंभ्रम' यांत संशय नाही' असें म्हटलें आहे. पण त्याच लेखांत' 'धन्य त्या देवलांची की, त्यांनी या नाटकाला इतपत तरी रूप आणलें आहे' असेंहि म्हटलें आहे. मुळांतील कादंबरीचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तीन जन्मांचें कथानक लक्षांत घेतलें म्हणजे कोल्हटकरांचीं दोन्हींहि विधानें एकदम पटतात. ' शापसंभ्रम ' रंगभूमीवर तितकेंसें यशस्वी झालें नाही हें खरें, पण त्या नाटकांत देवलांची कलाकुसर पाहवयास खास मिळते. देवलांचें कोणतेंहि भाषांतरित नाटक घ्या तें भाषांतर आहे असें आपल्यास कळलें तरच त्याला भाषांतरित म्हणतां येईल अशी त्यांची रचना आहे.

किंबहुना निव्वळ भाषांतरित म्हणतां येईल असें त्यांचें एकहि नाटक नाही—निदान ' मृच्छकटिक ' ' शापसंभ्रम ' किंवा ' संशयकल्लोळ ' हीं नाटकें तर खासच नाहीत. मुळांत असलेल्या किचकट आणि क्लिष्ट कथानकालाहि त्यांनी एखाद्या कुशल कारागिराप्रमाणे अत्यंत सुबोध, प्रासादिक आणि नाट्यपूर्ण असें करून सोडलें आहे. त्यांची नाट्यदृष्टि इतकी काटेकोर आणि चोखंदळ की कोठून कोणतें नेमकें उचलून घ्यावें म्हणजे आपली कलाकृति सुंदर दिसेल याचें जणु त्यांना उपजतच ज्ञान होतें असें वाटावें. त्यांचा 'फाल्गुनराव' विलायती आहे हें कुणाला सांगूनहि खरें वाटण्यासारखें नाही. त्याचा तोंडवळा इतका बदलला आहे की तो महाराष्ट्रीय नाही असें म्हणण्याचें धाडस समजदाराला देखील व्हायचें नाही. 'फाल्गुनराव' हें नाटक मर्फीच्या All in the wrong चें रूपांतर आहे किंवा मोलियरच्या Sguagoea चें रूपांतर आहे हें चिकित्सकाला देखील निश्चयानें सांगतां येणें कठिण आहे. ' संशयकल्लोळा'च्या तोडीचें प्रहसन मराठीवाङ्मयांत तरी दुसरें आढळावयाचें नाही. म्हणूनच आजच्या काळांत देखील तें चिरंजीव असल्यासारखें वाटतें. त्यांतील भाषणें, विनोद, प्रसंग आणि स्वभावचित्रण अगदी अवीट आहेत. जी गोष्ट ' संशयकल्लोळा ' ची तीच गोष्ट मृच्छकटिकाचीहि म्हणतां येईल. ' मृच्छकटिकां'त देखील देवलांचें अपूर्व कलालाघव खास दिसून येतें. स्वाभाविक व यथातथ्य प्रसंगांची गुंफण, प्रासादिक, खटकेबाज व चटकदार संभाषणें, नाट्यपूर्ण प्रसंगांची सहजतेने मांडणी, तर्कशुद्ध व स्वाभाविक घटना—सहजसुंदर कल्पनांची पखरण, रसपरिपोषक संगीत इ. गुणांनी देवलांचीं नाटकें वैशिष्ट्यपूर्ण वाटतात.

याच कारणामुळे ' मृच्छकटिका'ने किर्लोस्कर मंडळीला सावरलें, ' संशयकल्लोळा'ने तर फाल्गुनरावांत नवीन प्राणज्योत निर्माण केली. हीं दोन्हींहि नाटकें रंगभूमीवर आजतागायत टिकाव धरून आहेत.

त्यांच्या ' शारदा ' नाटकाने तर त्यांच्या यशोमंदिरावर सुवर्णकळस चढविला. या नाटकाने स्वदेशहितचिंतक व किर्लोस्कर नाटकमंडळी या मंडळ्यांना अलोट पैसा मिळवून दिला. याच नाटकामुळे कै॰ केशवराव भोसल्यांनी अल्पवयांत मुंबईकरांना वेड लावलें. याच नाटकाने बालाजरठविवाहाच्या सामाजिक प्रश्नाला हात घालून महाराष्ट्रांतील प्रत्येक घराला हालवून सोडलें. शारदा नाटकांतील प्रत्येक पात्र वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रत्येक व्यक्ति त्या काळच्या समाजांत वावरणारी आहे असा प्रत्यक्षाभास उत्पन्न करण्यास समर्थ आहे. देवलांच्या प्रतिभेचें उड्डाण गरूडपक्षाच्या भरारीसारखें नाही हें खास. पण त्यांच्या प्रतिभेचा उल्हास व्यवहारांतील सामान्य-
 वस्तूंच्या यथातथ्य चित्रणांतच प्रामुख्याने सामावला आहे. भूपृष्ठ सोडून परलोकांतील

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाषा यांचा नायक अगर नायिका दोघेहि बोलत नाहीत. सामान्य पांढरपेशाचें समाजजीवन हेंच देवलांच्या नाटकांतील विश्व आहे. उदात्त, भव्य असें त्यांत आढळावयाचें नाही. पण जें कांही आढळेल तें मात्र प्रत्यक्षानुभूतीचा आनंद द्यावयास पूर्णता समर्थ! सगळें सहजसुंदर, वास्तव, अगदी रोजचें! कृत्रिमतेचा, अतिरंजितपणाचा वासहि आढळावयाचा नाही. उसनें अवसान आढळावयाचें नाही. घोटाळेदुरान्वयाचें दर्शनहि त्यांत घडावयाचें नाही. जें सांपडेल तें सुंदर, स्पष्ट आणि नैसर्गिक. जें सांगावयाचें तें नाट्यपूर्ण रीतीने पण सहजतेने. भाषा लिहावयाची ती आपली रोजच्या व्यवहारांतील पण रेखीव, सुबोध, चटकदार—

या सर्व गुणांमुळे देवलांचीं नाटकें अत्यंत कुशलतेने लिहिलेलीं आढळून येतील. देवलांच्या नाट्यदृष्टीला मार्मिक अवलोकनाची जोड मिळाल्यामुळे अत्यंत खुबीदारपणें ठिकठिकाणी मार्मिक सूचकता आढळून येते. मनुष्यस्वभावाच्या सूक्ष्मतर छटांचेंहि त्यामुळे त्यांत दर्शन घडत असतें. त्यांच्या वाङ्मयीन गुणाला त्यांच्या अभिजात नाट्यदृष्टीची, मार्मिक अवलोकनशक्तीची जोड मिळाली. म्हणूनच देवलांचीं नाटकें नीरस, कंटाळवाणी वाटत नाहीत तर मनोरंजनाच्या द्वारें तीं कांही प्रमाणांत लोकशिक्षणाचें कार्यहि करीत असतात. माणसाचा स्वभाव फाजील संशयी झाला तर त्यांतून हॅम्लेट निर्माण होतो व त्यामुळे अनेक लोकांचा जीवननाश होतो हें शेक्सपियरने दाखविलें तर तितक्याच प्रभावीत्वाने संशयी माणसाची कशी हास्यास्पद स्थिति होते हें फाल्गुनरावाच्यारूपाने देवलांनी दाखविलें.

मराठी रंगभूमीच्या आजच्या पूर्ववत प्रगत होऊं पाहणाऱ्या परिस्थितीकडे पाहिलें म्हणजे आजहि असाच एखादा आधुनिक देवल आजच्या परिस्थितींत निर्माण झाला तर मराठी रंगभूमीच्या उत्कर्षाच्या कामीं त्याचा फार उपयोग होण्यासारखा आहे. चांगलीं नाटकें नाहीत, चांगले नट नाहीत या गोष्टी आजच्या प्रगतीच्या मार्गातील अडचणी समजल्या जतात. नाट्यगुण एखाद्या माणसांत जन्मजात असणें शक्य असलें तरी त्या गुणांचा विकास आणि वाढ व्हावयास नाट्यशिक्षकांचीहि जरूर असते. अशा प्रकारचे नाट्यशिक्षक महाराष्ट्रांत नाहीत असें मला म्हणावयाचें नाही. पण नाट्यप्रेमामुळे सरकारी नोकरीचे पाश तोडून स्वत:ला नाट्यसेवेला वाहून घेण्यांत देवलांनी जी आस्था आणि पोटतिडीक नाट्यकलेसंबंधीं व्यक्त केली ती आस्था व ती तळमळ आजच्या कांही नटवर्यांनी जर व्यक्त केली तरी बरेंचसें काम होण्यासारखें आहे. नाटकांसाठी नट अडून बसले तर नटांसाठी नाटककार अडून बसतील अशी निसर्गत: परिस्थिति आहे. जुन्या नाटकांवर देखील नट कांही दिवस आपलें कार्य चालवू शकतील हें कांही नाटकमंडळ्यांनी आज अनुभविलें आहे. अशाप्रकारें व्यवसायबुद्धीने असो वा खाजगी हौशी नाट्यमंडळाच्या द्वारें असो, होतकरू नटांना तरबेज करून मराठी रंगभूमीचा संसार नव्याने थाटण्यास या मंडळींनी सुरुवात केली तर नाटककारहि खडबडून जागे होतील आणि नाटककार आणि नट यांचें पूर्ववत् संघटन जुळून येऊन नट आणि नाटकांची अडचण दूर होऊं शकेल असें वाटतें. देवलांच्या या पुण्यतिथीच्या दिवशीं अशा तऱ्हेचा निर्धार करण्यानेच देवलांची पुण्यतिथी सार्थ होणार आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५०
सप्टेंबर

★ निद्रेस ★

ये देवी ! ये
शिणलेले माझे नेत्र मिटून घेतलें ॥

काळ वेलबुटीचा शालू लेवून,
तरंगिणी–कुरल–कुंतल मोकळे सोडून,
मृदु–गंध–समीर–कोमल–कर लांबवून,
मजसमानं श्रान्त पान्थ झोपवी जगांतले, ॥

धरणीचा विशाल मखमली पर्यङ्क
की तुझाच देवी ! मंगल मादक अङ्क;
चांदवा नीलनभाचा ताणला अनन्त
वा पदर तुझा पसरला लांबपर्यन्त;
लुकलुकते नीलांबरिं असंख्य तारावलि,
शय्यागृहिं रात्रदीपमाळ लावली,
कां स्निग्ध–मंद तेवती तुझ्या नेत्र–ज्योती,
वा नील अंशुकांतल्या टिकल्या झळाळताती,
शान्त आसमंत, शान्त सर्वहि दिगन्त,
शांतिगीत अवतरलें काय मूर्तिमन्त;
दिव्यगान ऐकुनी समस्त विश्व झिंगलें. ॥

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीव झोपले अशेष, मीच एकला अनिमेष,
जागतों, तडफडतों, कुशी सदा बदलतों,

नक्षत्रें—सहभागी आकाशाचीं अनिमिष लोचनें,
माझ्या अनिद्र—दिनांचीं बोलकीं बिंदु—चिन्हें—

मोजतां, मोजतां, संपलीं संख्याशून्यें.
लोटलीं युगें, सुटले सगे, थकलीं अंगें,

पुढें पसरला पथ अनन्त, गात्र शिथिल, चरण श्रान्त,
चालूं ? थांबूं ? निजूं ? मानस जाहलें संभ्रान्त.

चालण्यांत संपलें जीवनें परि न संपली वाट
कां चुकला माझा मार्ग ? अतां परतणें व्यर्थ.

चालणें जीवन, विश्रांतींत विसावलें मरण,
कळे परंतु वळे मला ना सुबोध तत्त्वज्ञान,

विवशतेने अंग टाकिलें, अंकीं शिर पडलें ॥

आसुसलेले नेत्र निरखती दुरावलेल्या पथा,
अपुऱ्या आशा अंतरिच्या-ही हृदयीं शाश्वत व्यथा,

नको, नको, असह्य. पाहिजे मला पूर्ण विस्मृती,
चिरनिद्रा मज सुखसंप्राप्ती, पुन्हा नको जागृती.

अंत ठेपला; अंत कां बघसी ! ये प्रेमले ! ॥

—द. रा. जोशी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वृक्षांची जीवनकथा

★

प्रा. म. वा. मिराशी

छायामन्यस्य कुर्वन्ति तिष्ठन्ति स्वयमातपे ।
फलन्ति हि परार्थे च तेन एते महाद्रुमा: ॥

राष्ट्राची गमावलेली वनसंपदा पुन: स्थापित करण्याचा संकल्प सुटला. वन-महोत्सवाच्या निमित्ताने वृक्षांचा भारतीय संस्कृतीशी असलेला परंपरागत संबंध दृढतर झाला आहे. सावित्रीच्या पातिव्रत्याने अमर झालेला वटवृक्ष, भगवान बुद्धाच्या साह-चर्याने त्रिखण्डांत गाजलेला बोधिवृक्ष यांची स्मृति आज नव्याने जागृत होत आहे. "गुरोऽस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशया:" हा अध्ययनअध्यापनाचा अभिनव नि आश्चर्यकारक प्रयोग ज्या वटतरूच्या छायेखाली पाहून भारतेतर जगत स्तिमित झालें त्या वृक्षाचे वंशज, आप्त, सगेसोयरे भारतवासीयांच्या पूजेस प्राप्त झाले आहेत.

लक्षावधि वृक्षांचीं रोपें भूमींत विधिपूर्वक सुप्रतिष्ठित करून वनवृद्धीच्या व्रताची सांगता झाली असतांना आता या महोत्सवाचें अधिष्ठान असलेल्या वृक्षांची जीवन-कथा श्रवण करणें उचित होईल.

वृक्षरूपांचीं वैशिष्ट्यें

वनस्पतींच्या बाह्य स्वरूपांत अमर्याद विविधता आढळते. त्या नानाविध स्वरूपांपैकीं आपल्या शरीरसौष्ठवाने सर्वसाधारण माणसाला आकर्षित करणारें नि म्हणूनच त्याच्या विशेष परिचयाचें रूप कोणतें असेल तर तें वृक्ष होय. भूमींतून पाणी आणि त्यांत विरघळलेलीं लवणें शोषून घेणारें मूळ, साऱ्या वृक्षाला आधारभूत असणारें खोड, त्यावर धारण केलेलीं सहस्रावधि हिरवीं पानें आणि वृक्षांना आपल्या सौंदर्याने नटविणारीं फुलें हे वृक्षाचे प्रमुख अवयव होत. यांपैकी मुळें, खोड नि पानें यांच्या-द्वारें झाडाची वाढ आणि आहारपोषण होत असतें. फुलांमध्ये वृक्षाचीं प्रजननाचीं अंगें (reproductive organs) वसलेलीं असतात. फुलांतूनच बीजें आणि फळें निर्माण होतात आणि या बीजांपासून पुनरपि वृक्षाची निर्मिति होऊन—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आधीं बीज एकलें।
बीज अंकुरलें। रोप वाढलें
एका बीजापोटीं। तरु कोटी। जन्म घेती–
सुमनें फळें। —

ही साखळी अखण्ड चालू राहते.

वृक्षांची शरीररचना अत्यंत जटिल असते. त्यांच्या घडणींत अतिशय गुंतागुंत असते. अन्नाची वाहतूक करणाऱ्या पेशी, शरीराला सुदृढ करणारे "स्नायू" आणि अंग-प्रत्यंगांत संवेदना पसरविणारी प्राथमिक स्वरूपाची व्यवस्था त्यांच्या शरीरांत आढळते. प्राण्यांहून त्यांची शरीररचना भिन्न असली तरी दोघांच्या शरीरयंत्रांत सारख्याच योजना व सोयी दिसून येतात नि म्हणूनच त्यांच्या जीवनव्यापारांत साम्य प्रतीत होतें. श्वासोच्छ्वास, अन्नपचन, अन्नाभिसरण, रसनिर्मिति, मलोत्सर्ग इत्यादि मानवाच्या शरीरांत आढळणाऱ्या नानाविध जीवनक्रिया वृक्षांच्या अंतरंगांतहि अखंड चालू असतात. शिवाय वनस्पती या मूलतःच स्वयंपोषी, म्हणजे आपलें अन्न स्वतःच तयार करूं शकत असल्यामुळे वृक्षांच्या जीवनव्यापारांत अन्ननिर्मितीच्या प्रमुख क्रियेचा अन्तर्भाव होत असतो तो निराळाच.

वृक्षांचा जीवनक्रम

वृक्षांच्या जीवनांत एक प्रकारचा सुसंबद्ध ताल असतो. त्यांच्या जीवनांतला कांही काळ शक्तिसंचयाचा तर अितर त्या संचित शक्तीचा व्यय करण्याचा असतो. जीवनाच्या घड्याळाला किल्ली देऊन झाली की ती क्रमशः उकलण्याची वेळ पाठोपाठ येत असते. वृक्षांच्या दैनंदिन आयुष्यांत उद्योग नि विश्राम यांची सांगड दिवस-रात्रीशीं नीट गुंफलेली असते.

परंतु, या दैनंदिन धडामोडीव्यतिरिक्त वृक्षांच्या आयुष्यांत अधिक महत्त्वाची नि मूलगामी परिवर्तनें होत असतात. हीं परिवर्तनें बदलत्या ऋतुमानाशी निगडित असतात.

आंग्ल कवि कीट्स् याने मानवी आयुष्याचे चार ऋतू ("Human Seasons") कल्पिले आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांत निसर्गतः एक वर्धमान शैशवावस्था असते. त्यानंतर अैन उमेदीचा तारुण्यकाळ येतो. या काळापर्यंत जीवनाचा आलेख वरवर चढत असतो. पुढे अनुभव नि विचार यांनी परिपक्व अशी प्रौढावस्था प्राप्त होते. जीवनालेख आता खाली उतरूं लागतो, कार्यशक्ति मंदावते नि अखेरीस जराजर्जर शरीर मृत्यूस आमंत्रण देतें. अशा रीतीने शैशव, तारुण्य, पक्वता नि वृद्धापकाळ अशीं स्थित्यंतरें मानवीजीवनांत होत जातात. वृक्षांच्या जीवनग्रंथाचीं अशींच चार प्रकरणें असतात. पल्लवोद्गम, पुष्पोद्भव, फलनिर्मिति आणि शुष्कावस्था यांनी तीं सूचित केलीं जातात. या प्रत्येक प्रकरणाची मर्यादा व्यक्तिशः बदलत असते– प्रत्येक वृक्षाच्या आंतरिक सामर्थ्यांवर अवलंबून असते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वृक्षांची आयुर्मर्यादा बरीच मोठी असते. कांहींची आयुर्मर्यादा शतकांनी मोजतां येते ! वर्षानुवर्षे जीवन जगणाऱ्या या वनस्पतींना ऋतुमानानुसार होणारे चढ-उतार प्रतिवर्षी अनुभवावयास मिळतात. मानवांना न लाभलेली ही अेक निराळीच मजा वृक्षांच्या आयुष्यांत पाहावयाला सांपडते. अनेक पावसाळे पाहणाऱ्या या वृक्षांच्या जीवनांत तारुण्याच्या बहर प्रतिवर्षी येत असतो.

वर्षाऋतूंत बीजांतून अंकुर बाहेर पडतो. थोडी ऊन नि ओलावा यांच्या साहाय्याने बीजांतील सुप्त जीव जागृत होतो. पानाच्या कळ्या उमलून मूळ भूमींत शिरतें, रोप भूमीच्या वर येऊन आयुष्याचा प्रारंभ होतो.

शरदऋतु अेन उमेदीचा काळ. यावेळीं वृक्ष पल्लवसंभाराने नटलेले असतात. तारुण्य त्यांच्या रोमरोमांत सळसळत असतें. प्रशांत अशा बाह्य आवरणाखाली प्रचंड रासायनिक क्रिया-प्रतिक्रिया चालू असतात.

शिशिरांत म्हातारपणाची कळा येऊं लागते. मत्यांना जरा अटळ आहे. बीजें व फळें निर्माण करून वृक्ष आपल्या भावी पिढीची व्यवस्था करून ठेवतात. शिशिरांत जीवनाग्नि मंद होतो परंतु तो पूर्णतया निमालेला असतो. ती निवृत्तीची, विश्रांतीची वेळ असते. त्यावेळीं आयुष्याला पूर्णविराम मिळण्याचा संभव असतो. परंतु बहुधा तो स्वल्पविराम, अर्धविराम ठरतो. भावी चढाईची जणूं ती तयारी असते. पुनरुत्थानासाठी जणूं ती प्रशांत चळवळ असते. आगामी उड्डाणाचा जणूं तो पवित्रा असतो.

वसंतांत वृक्षांना प्रतिवर्षी कायाकल्पाची संधी मिळत असते. मृत्यूचें आमंत्रण लांबणीवर पडतें. यावेळीं निरुपयोगी श्रांत अवयव गळून पडतात आणि नवीन निर्माण होतात. परंतु अशा रीतीने जीवनाच्या विनाशांतून होणाऱ्या जीवनाच्या विकासाला कांही मर्यादा असते. अखेरीस काळ जिंकतोच !

वृक्षांचा इतिहास

या विश्वांतील सर्वच वनस्पती कांही वृक्षरूपाने आढळत नाहीत. तेव्हा, हें वृक्षांचें रूप वनस्पतींनी केव्हा धारण केलें असावें ? सृष्टीच्या प्रारम्भापासूनच वृक्ष अस्तित्वांत होते काय ? इत्यादि प्रश्न उभे राहतात. या प्रश्नांचें उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्यास आज वृक्षरूपाने उभ्या असणाऱ्या या वनस्पतींमागे चराचर सृष्टीच्या साऱ्या इतिहासाची पार्श्वभूमि असल्याचें आढळून येतें.

बायबलच्या तत्त्वज्ञानानुसार आज अस्तित्वांत असणारीं वनस्पतींचीं सारीं रूपें प्रारंभापासूनच अस्तित्वांत होती असें मानलें आहे—

"And God said: let the earth put forth grass, herb yeilding seed and fruit tree bearing fruit after its kind wherein is the seed thereof, upon the earth; and it was so."

—*Genesis. i. 11.*

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवच, आणि मोठमोठाल्या पानांचे शेंड्यांवर उगवलेले गुच्छ यांमुळे त्या अरण्याला कांही विशेषच शोभा होती. मात्र या जंगलांत मोहक रंगाची फुलें नव्हती, घरटीं करून राहणारे पक्षी नव्हते, "जंगलाच्या राजा"चा अवतार अजून व्हावयाचा होता. या वृक्षांपैकी कांही वृक्ष बीजें धारण करणारे होते. परंतु त्यांची संख्या थोडी होती.

यापुढे पृथ्वीची प्रकृति बदलली. तिने ऊब नि ओलावा देऊन संगोपन केलेले वृक्ष कोलमडून पडले; नष्ट झाले, आणि शुष्क, थंड वातावरणांत दिवस कंठण्यासाठी वृक्षांचे नवीनच समूह निर्माण झाले. हे वृक्ष भूमीवरच्या जीवनाच्या दृष्टीने अधिक यशस्वी ठरले. पृथ्वीच्या तत्कालीन दक्षिण गोलार्धांत या वृक्षांची दाट वसाहत होती, आणि मध्यप्रदेशाच्या चांदा जिल्ह्यांत या वृक्षांचे अवशेष आढळतात. हिमनद्यांचे पूर वाहूं लागतांच पृथ्वीच्या अितिहासांतलें हें दुसरें अरण्यहि नामशेष झालें.

यानंतर पृथ्वीच्या इतिहासाच्या मध्यकल्पांत (Mesozoic era) म्हणजे साधारणतः ५० ते १२५ दशलक्ष वर्षांपूर्वीच्या काळांत बीजधारी वृक्ष पुन्हा भरभराटीस आले. त्यांच्यापैकी कांही आज देवदार, पाईन वृक्षादि वंशजांच्या रूपाने पाहावयाला मिळतात. याच कालखंडाच्या उत्तरार्धांत आजचीं फुलझाडें उदयास आलीं असावींत. या फुलझाडांमध्ये आज रोपटीं, झुडुपें आणि वृक्ष अशीं त्रिविध रूपें आढळतात. तीं प्रथम कोणत्या स्वरूपांत अवतरलीं असावींत यासंबंधीं मतभेद असले तरी बऱ्याच शास्त्रज्ञांच्या मतें वृक्ष हेंच फुलझाडांचें प्राथमिक स्वरूप होय. आज समशीतोष्ण कटिबंधाप्रमाणे उष्ण कटिबंधांतहि वृक्ष आढळत असल्यामुळे हीं प्रारंभींचीं वृक्ष-स्वरूप फुलझाडें कोणत्या प्रकारच्या हवामानांत तयार झालीं असावींत हें सांगणें काठिण आहे. उंचींत आणि रुंदींत वर्षानुवर्ष होणारी वाढ आणि शरीरांत स्थायी स्वरूपाच्या सुदृढ पेशींची निर्मिति या दोन रचनावैशिष्ट्यांनी युक्त असलेली शरीरयष्टि घेऊन अवतरलेलीं हीं वृक्षरूप फुलझाडें अखेरीस भूमीवर स्वामित्व गाजवूं लागलीं. यथाकाल खडतर परिस्थितींत आणि प्रतिकूल वातावरणांत तग धरण्याच्या दृष्टीने फुलझाडांनी गवतासारखें कृशकाय स्वरूप धारण केलें असावें.

प्राचीन वृक्षांच्या अपयशाची मीमांसा

वृक्षांच्या अितिहासाचा आपण हा जो धावता आढावा घेतला त्यांत आपल्याला आढळून आलें आहे की वृक्षनिर्मितीचे अनेक प्रयत्न वनस्पतींनी केलेले आहेत. यांपैकी कित्येक वृक्ष आज केवळ त्यांच्या खडकांतील अवशेषांवरून आणि ठशांवरूनच तेवढे ज्ञात आहेत. भूमीवर आपलें साम्राज्य प्रस्थापिण्यांत हे वृक्ष कां अपयशी ठरले असावेत ! त्यांच्यापैकी बहुतेकांना भूमींतील अन्न शोषण्यासाठी आधुनिक वृक्षांच्या मुळांअितकीं परिपूर्ण नसलीं तरी बरींच जटिल अंगें लाभलीं होतीं. वातावरणाच्या आघातांशीं सामना करूं शकेल असें सुदृढ स्नायुयुक्त शरीर त्यांच्याजवळ होतें. सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊं शकतील अशा हिरव्या, पसरट पानांची त्यांना देणगी मिळाली होती. त्यांच्या शरीरांतील अन्नसंवाहनाची व्यवस्थाहि समाधानकारक होती. हें सारें खरें असलें तरी अेका गोष्टीचा त्यांच्यांत अभाव होता, आणि हा अभावच त्यांच्या नाशास कारणीभूत झाला. या वृक्षांची प्रजनन-व्यवस्था

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(Reproductive system) मात्र अितर अवयवांसारखी प्रगत नव्हती. त्यांनी पाण्याचें परंपरागत दास्य अजून झुगारून दिलेलें नव्हतें. त्यांच्या पुनरुत्पादनासाठी पाण्याची आवश्यकता पूर्णपणें संपलेली नव्हती. वाऱ्याच्या लहरीवर त्यांचा प्रसार अवलंबून होता. या वृक्षांचीं बीजें नि पर्यायाने त्या बीजांतील भावी वृक्षाचा अंकुर सुरक्षित ठेवण्याची सोय त्यांच्या शरीररचनेंत नव्हती. या उणीवेमुळे हे भीमकाय वृक्ष जीवनाच्या संघर्षांत तग धरूं शकले नाहीत. प्राचीन वृक्षांच्या या अपयशाने उद्‌विकासाचें एक महत्त्वाचें तत्त्व शिकविलें. तें सर्वांगीण विकासाचें तत्त्व होय. एकांगी वाढ, एकतर्फी सुधारणा कधीच शाश्वत होत नसते. मानवी संस्कृतीचा विकासहि याच तत्त्वावर आधारलेला नाही का ?

फुलझाडांचें अपूर्व यश

प्राचीन वृक्षांच्या अपयशाचें कारण नेमकें हेरून निसर्गाने फुलझाडांच्या यशस्वी वृक्षरूपाचा नमुना समोर आणला. त्यांच्या शरीरांतील रसाचें संवाहन करणारी व्यवस्था आणखी सुधारून शरीरयंत्र परिपूर्ण बनविलें. प्रजननांत घडून येणाऱ्या अंतिम मीलनासाठी लागणारी पाण्याची आवश्यकता नाहीशी करण्याकरिता त्यांच्या शरीरांतच नवीन साधनें निर्माण करून तें मीलन घडवून आणलें. फुलांची निर्मिति करून किड्यांच्या साहाय्याने परागकणांचें नियमित सिंचन स्त्रीकेसरावर होईल अशी निश्चित व्यवस्था केली व पुनरुत्पादनांत होणारा काळ, शक्ति आणि सामुग्री यांचा अपव्यय थांबविला. नवीन पिढीचा अंकुर तयार झाल्यावर, मातेने नवजात अर्भकाला स्तनपान करावें तद्वत्, त्याच्या पोषणाची सोय बीजांत करून ठेवली. नव्हे, आणखी एक पायरी पुढे जाऊन हीं बीजें कोंवळीं असेतों पुष्पांतील स्त्रीकेसरांत सुरक्षित दडवून ठेवलीं आणि मग अखेरीस वृक्षांची स्थिर प्रकृति लक्षांत घेऊन आता आपल्या पायावर उभे राहूं शकतील असे हे जीव बीजांच्या आणि फळांच्या रूपाने वारा, पाणी आणि प्राणी यांच्या सहकार्यानें दूरवर जाऊन पोहोंचतील अशी व्यवस्था करून दिली ! आहारपोषणाची उत्तम व्यवस्था, परिस्थितीला जुळणारें सुदृढ शरीर, आणि वंशप्रसाराला उपयोगी पडेल आणि भूमीवरच्या जीवनांत यशस्वी होईल अशी पुनरुत्पादनाची योजना या तिन्ही गोष्टींचा समन्वय आधुनिक वृक्षांत झाल्यामुळे तो खऱ्या अर्थाने " वनस्पति " (वनाचा पति) ठरला आहे !

☆

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नादलुब्धाच्या स्मृतिलहरी... (९)

सा व ळा रा म

मधुकर श्रीधर मंग्रूळकर

१९४४ साली नागपुरांत पहिली संगीत कॉन्फरन्स भरली तेव्हा येथील स्थानिक हौशी वादकांना एकत्र जमवून त्यांचे वृंदवादनाचें दिग्दर्शन करण्याचें काम चालकांनी सावळारामपंतांना सांगितलें होतें. विविध प्रवृत्तींच्या आणि प्रकृतीच्या वाद्यांना आणि वादकांना एकत्र जमवून त्यांच्या संकलनाने संगीत परिषदेचें उद्घाटन करावचें जबाबदारीचें आणि जोखमीचें काम त्यांचेकडे होतें. त्यांनी तें कार्य पूर्ण केलें. पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमानंतर, त्या वृंदवादनाचें सगळ्या कलावंतांनी टाळ्या वाजवून कौतुक केलें. स्वत: सावळाराम त्यांत बांसरी वाजवीत असत. रागाचा उठाव करण्यासाठी जेव्हा प्रत्येकाला स्वतंत्रपणें रागदर्शन करण्याची पाळी येई त्यावेळीं प्रत्येकाचा भगदूर दिसत असे. त्या थोड्या वेळांत देखील सावळारामांनी आपलें त्या वाद्यावरील असीम प्रभुत्व व्यक्त केलें होतें.

नंतर स्वतंत्र असा त्यांचा कार्यक्रम झालाच ते कांही इतर कलावंत मंडळींना अपरिचित नव्हते. १९३५ साली जबलपूर येथे व त्यानंतर आग्रा येथील परिषदांत इतर कलावंतांपुढे त्यांनी आपली कला हजर केली होती. पण त्यांची नागपूरची ही बैठक विशेष रंगली.

अखिल भारतांत आपल्या कौशल्याने नांव कमाविलेले जे अगदी थोडे असे नागपुरी कलावंत आहेत, त्यांत सावळारामांची गणना अवश्य केली पाहिजे. १९४१ पासून १९४८ मध्ये नागपूर नभोवाणी केंद्र तयार होइतोंपावेतों ते मुंबई नभोवाणी केंद्रावर बांसरीवादक म्हणून स्वतंत्र कार्यक्रम करण्यास जात असत. १९४६ साली पतियाळा दरबारतर्फे संगीत परिषदांत त्यांना निमंत्रण आलें होतें. तिथेहि त्यांनी मजलिस मारली. बरेली येथे आर्ट्स् कॉलेजतर्फे "फेस्टिवल डे" साजरा होत असतो. तिथे त्यांना दोनदा जावें लागलें. व्हायोलिनिस्ट धुंडिराज पलुसकर वगैरे मंडळींहि आमंत्रित होती. त्या कार्यक्रमांत देखील, त्यांची उत्कृष्ट कलावंत म्हणून तारीफ झाली.

जें चांगलें त चांगलेंच. पण या चांगलेंपणासाठी, सावळारामांना ज्या खस्ता खाव्या लागल्या, जे क्लेश सहन करावे लागले, त्यांचा नुसता पुनरुच्चार करणें म्हणजेहि एक महासंकट वाटतें. पूर्णांध, दृष्टि नसलेल्या, प्रत्येक बाबतींत परावलंबी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

झालेल्या माणसाला पदोपदीं किती अडचणी येत असतील यांची नुसती कल्पना केली तरी पुरे. सर्वसाधारण माणूस अशा अडचणींनी पार खचून गेला असता. आपल्या सर्व अडचणींना मागे टाकून आज एक यशस्वी कलावंत म्हणून सावळा-रामपंतांनी जी कीर्ति कमाविली आहे, त्यांतच त्यांच्या आनंदी पण कष्टाळू स्वभावाचें गमक आहे.

वयाच्या दुसऱ्या वर्षीच जर देवी निघून अंधत्व आलें नसतें तर कुणी सांगावें आज सावळारामपंत एखाद्या रेव्हेन्युखात्यांत मालकाळी वसूल करतांना दिसले असते. या जागेपेक्षा जास्त जबाबदारीचीं कामें करण्याची त्यांची कुवत नसती असे मला म्हणावयाचें नाही. परंतु आपल्या समाजांत अशा प्रघात पडला आहे की, वडिलांची नोकरी किंवा पेशा मुलाकडे वारसा या नात्याने बहुधा चालायचा. सावळारामपंतांचे वडील चांद्याला वसूलबाकीनविसाचें काम करीत. त्यांना भजनें म्हणण्याचा छंद असे. त्यांची एक भजनमंडळी होती. सुरेल भजनांसाठी ते प्रसिद्ध होते.

दुःखी संसाराचे चटके बसले म्हणजे माणूस वैराग्यशील होतो; म्हणूनहि कदाचित् वडील भजनाकडे वळले असावेत. प्रथमपत्नी निवर्तल्यानंतर त्यांनी दुसरी केली. सावळाराम हे द्वितीय पत्नीपासून झालेलें आणि उरलेलें एकुलतें एक अपत्य. उतारवयांत झालेल्या या अपत्याविषयी त्यांना अतिशयच ओढ होती. त्याला ते जीव की प्यार करीत. लहानग्या सावळारामाच्या डोळ्यांतल्या दीप्तीकडे पाहून हें पोर मोठेपणीं कुणीतरी विलक्षण होणार अशीं भाकितें त्यांच्या मातापितरांनी, त्यांच्या जन्मकाळींच वर्तवून ठेवलीं होतीं.

मुलाचा दुसरा वाढदिवस मोठ्या थाटाचा झाला. कांही दिवसांनी त्याचें अंग कणकणलें, मातापित्यांचीं तोंडें चिमणीसारखीं झालीं. त्याच्या अंगाची काहिली पाहून त्यांच्या जीवाचा थरकांप होऊं लागला. हळूहळू रोगाने आपलें स्वरूप पटवायला सुरवात केली. त्यांना देवी निघाल्या होत्या. प्रयत्नांची शिकस्त झाली. जीव वाचला, पण देवी जातांना घेऊन गेल्या त्यांचे डोळे ! ज्या डोळ्यांत त्यांच्या मात्यापित्यांनी भविष्यकाळचीं चित्रें निरखलीं होतीं, ते डोळे !

दोन वर्षांचें अंधळें मूल खांद्यावर टाकून भजनें करायला जावें. तेवढाच त्या पोराला दिलासा होईल, असें वडिलांना वाटे. जो मुलगा म्हातारपणीं त्यांची काठी व्हायचा, त्या मुलाचे ते आता पाय झाले होते. हा धक्का अतिशय जोराचा होता. त्यांना वेडाचा झटका आला, आणि एक दिवस या वेडाच्या भरांतच त्यांचा अंत झाला. सात वर्षांचा सावळाराम पितृविहीन झाला. संसाराच्या गाड्याचें एक चाक निखळलें. उरली होती एक आई. ती देखील सहा महिन्यांतच वडीलांच्या भेटीला गेली. दुसरेंहि चाक निखळलें.

मामांनी त्यांना नागपुरास आणलें. सहासात वर्षांचें कोंवळें वय. त्या अनाथ अंध बालकाला कसलींहि बंधनें नव्हतीं. मनाप्रमाणे वागण्याची त्याला मुभा होती.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तो काळ मराठी रंगभूमीच्या भरभराटीचा होता. नागपूरवऱ्हाडकडे कापसाची सुवर्णखानि गवसली होती. म्हणून साऱ्या नाटककंपन्यांचे महिनोंगणती तळ नागपुराला पडले नाहीत असें व्हायचें नाही. संगीत कंपन्यांचा मुक्काम विशेष! "ललितकला", "बलवंत नाटक मंडळी," "यशवन्त संगीत नाटक मंडळी" वगैरे नाटक कंपन्यांवर नागपूरकरांचें जास्त प्रेम. त्याकाळीं या कंपन्यांच्या नाटकांतलीं पदें लोकप्रिय होत होतीं. अंध सावळाराम अशा गाण्यांवर अर्थातच खूष व्हायचे. सहसा नाटकें चुकायचीं नाहीत. नाट्य हें दृश्यकाव्य होय. त्या सौख्याला मुकल्यामुळे, सावळारामाचे कान अतिशय तीक्ष्ण झाले होते. ओळी तावडतोब टिपल्या जात. सवाई गंधर्व, मास्तर दीनानाथ, शंकरराव सरनाईक इत्यादि गायक नटांचीं पदें ते हुबेहुब गाऊं लागले. केळीबाग रोडवरील पोफळी यांचे चक्कीजवळ, त्यांच्या मामांचें घर होतें. त्या घरून बाहेर पडले की महादेवाचें देऊळ लागे. ती वाट पायांच्या ओळखीची झाली होती. त्याकाळीं देवळांत, सहसा देवाशिवाय इतर कुणी येत नसे. गाभाऱ्यांत जाऊन बसावें आणि आदल्या दिवशीं ऐकलेलें गाणें म्हणत बसावें.

" —पुष्पपराग सुगंधित........ "

मास्तर दीनानाथांची मोहिनी त्यांच्यावर जबरदस्त होती. विजेच्या चमकत्या पात्यासारखी त्यांच्या तानेची फेक कुणालाहि दिपवीत असे. आवाजांत कुठेहि चुकारपणा नाही. सरळ जावें आणि परत येतांना दोन चार वेलबुट्या घेत समेवर यावें. चमत्कृति हा त्यांच्या गायनाचा विशेष. "परवशतापाश दैवें", "शांत दांत", "प्रिया पे निजांकीं", "मर्म बंधांतली ठेव ही", "रवि मी चंद्र कसा–", "शरा मी वंदिलें—" वगैरे गाणीं ते सहीसही वठवूं लागले. ही तालीम देवळांत होती तोंपर्यंत बरें. पुढे वाटलें, आपल्या गाण्याला साथ हवी. मामांची होती एक पेटी. पण या अंधळ्याला कुणी हात लावूं देईना. उमजा उलटीकडून वाजवून मोडून तिचा बाजा झाला तर काय घ्या! एक दिवस मामा बाहेर गेलेले पाहून चांचपडत पेटी शोधून काढली. वाकड्यातिकड्या अंगुलीनर्तनाच्या कसरतींतून दोन तीन दिवसांनी एक गाणें बाहेर पडलें. त्या गाण्याची आठवण झाली म्हणजे सावळाराम-पंतांना अजूनहि हसूं येतें. "नयनी लाजवित....बहुमोल रत्ना..." हळुहळु पेटीचा सराव होऊं लागला. "कठिण कठिण, कठिण किती", "लपविला लाल गगनीं मनी परिदिन", "भालीं चंद्र", "युवतिमना दारुण रण रुचिर प्रेमसेवा" वगैरे लोकप्रिय पदें हस्तगत झालीं. मामांना मात्र या प्रगतीचा सुगावाहि नव्हता. पेटी वाजवायला सुरवात केली; पण त्यांतलें तंत्र माहित नव्हतें. 'सा' कुठे अन् कसा सापडेल हें देखील माहीत नव्हतें. त्यावेळीं गणपतराव दीक्षित नांवाचे गृहस्थ पेटी वाजवीत असत. त्यांनी "सा" सांगितला आणि सप्तक समजावून दिलें!

१९१९ मध्ये त्यांचें उपनयन झालें. त्यांतील एका क्षुल्लक प्रसंगाने त्यांच्या पुढील जीवनाला कलाटणी मिळाली. "लहानग्या बटू" स भिक्षावळ आली होती. दुपारी पोस्टाने एक लांबट नळकांडें आलें. वरचीं आवरणें फाडतांना सगळ्यांनाच कुतूहल होतें. हळूच एक चार आणे किंमतीची शिशाची बांसरी त्यांतून बाहेर पडली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांच्या एका नातलगाने त्यांना भेट पाठविली होती. या सहा छिद्रांच्या वाद्यांतून सप्तस्वरांचें गाणें बाहेर कसें पडणार याचा त्यांना मोठा प्रश्न पडला. चारपांच रागांची ओळख झाली होती. कोमल तीव्र स्वरांचे हे राग या वीतभर नळींतून कसे बाहेर पडतील? प्रथम भजनांनी साथ दिली. ' लंबोदर गिरिजा नंदना ', आणि " मूर्ती गणपतीची । दिसे किती सुरम्य बहु साची " हीं पदें त्यावर बसलीं. कोणत्याहि वाद्यावर हात तयार होण्यासाठी प्रथम ' सरगम ' तयार करावे लागतात. हें झालें तंत्र. पण स्वत:चा मंत्र जोरदार असल्यावर तें तंत्र बाजूला पडतें. सावळारामांनी स्वत: एकदम पेरें वाजविणें सुरू केलें होतें. ' नाथ हा माझा मोहीकला ', ' सत्य वदे वचनाला ', ' मम आत्मा गमला— ' वगैरे गाणीं अंग धरूं लागलीं. एकच प्याला, भावबंधन, पुण्यप्रभाव, सौभद्र, रणदुंदुभि, संन्यस्त खड्ग वगैरे नाटकांतील पदांचा फडशा पडूं लागला. तबल्याशीं अजून ओळख झाली नव्हती. विशेषत: बांसरी हे वाद्य त्याकाळीं तबल्याच्या साथींत वाजवायच्या योग्यतेचें आहे असें इकडे कुणी समजत नसत. रामभाऊ अभ्यंकर नांवाचे नॉर्मल स्कूलमधील शिक्षक होते. ते कधी-मधी तबल्यावरोबर बांसरी वाजवीत असत. त्यांचें एकदा गणेशोत्सवांत " भोग कसा उलटाची शोभे मुलाला " हें पद दादऱ्यांत ऐकलें. तेव्हा यांनाहि वाटलें आपण तबल्याशीं केव्हातरी वाजवून बघायला हवें.

एक दिवस असेंच बांसरी फुंकीत असतां त्यांचे मित्र श्री. बाबूराव देवळे त्यांचे कडे धावत आले अन् त्यांचा हात धरून अक्षरश: ओढीत घेऊन चालले. बऱ्याच अंतरानंतर त्यांनी सांगितलें—

' अरे ! म्युनिसिपालिटींत " बाल वक्तृत्वोत्तेजक " सभेचें काम सुरू व्हायचें आहे. तिथे बांसरी वाजवायची आहे. चल— '

अध्यक्षस्थानीं " स्वातंत्र्य " चे संपादक श्री. अण्णाजी चोरघडे वकील होते. देवळ्यांनी हात धरून स्टेजवर सावळारामाला नेऊन बसविलें अन् म्हटलें,— " कर सुरू— "

चीज सुरू झाली. 'कृष्ण मुरारी विनती करत कर हारी—' हें त्यांचें पेटंट पद होतें. टाळ्यांचा कडकडाट झाला. अध्यक्षांनी त्यांची पाठ थोपटली अन् पांच रुपये इनाम दिले. मुलांच्या सभेंतील ती बातमी वाऱ्याप्रमाणे पसरली. सावळारामांच्या मित्रवर्गाला फार आनंद झाला. बाबूराव देवळे, श्री. वा. नेरकर, गंगाधरराव रत्नपारखी, बाबूराव देशपांडे वगैरे मित्रांना धन्य वाटलें. त्या पांच रुपयांतून प्रथम सव्वादोन रुपयांची नवी बासरी घेण्यांत आली. अन् त्या बांसरीचा अनावरण समारंभ सर्व मित्रांसमवेत मुन्नालाल हलवायाच्या दुकानांत उरलेल्या पैशांतून पार पडला !

त्यानंतर जाहीर असा कार्यक्रम १९२० सालीं नील सिटी हायस्कूलांत झाला. आजचे नांवाजलेले विचारवंत लेखक व वक्ते श्री. माधवरावजी कानेटकर त्यावेळीं त्या शाळेंत शिक्षक असून बांसरी वाजवीत असत. त्यांच्या उपस्थितींत पहिला जाहीर असा कार्यक्रम झाला. दिवसेंदिवस नांव वाढत होतें. कार्यक्रमांची फुकट बोलावणीं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येत असत. दहा दिवसांच्या गणेशोत्सवांत चाळीस फुकट कार्यक्रम केल्याचा विक्रमहि सावळारामांनी केला.

जरा अंतर्मुख झाल्यानंतर मात्र त्यांना हें होतें आहे तें विशेष बरें नव्हे असें वाटूं लागलें. कदाचित् फुकट कार्यक्रम मिळतात म्हणून लोक तारीफ करीत असतील असें त्यांना वाटे. तबल्याचें ज्ञान नाही, रागांची माहिती नाही आणि कार्यक्रम तर वारेमाप चाललेले. गायनशाळेंत जाऊन शिकणें त्यांना आवडत नसे. मग जमणार कसें ? पण रा. ब. नारायणराव वाडेगांवकरांच्या आग्रहामुळे त्यांना शं. ल. प्रवर्तकांच्या चतुर संगीत महाविद्यालयांत भरती केलें. १९२२ च्या सुमारास पंडित भातखंड्यांनी ना. श्रीमंत भाऊसाहेब काळीकर यांना हाताशीं घरून हें विद्यालय स्थापन केलें होतें. कसाबसा अभ्यास चालूं होता. पुढे चालकांशीं मतभेद होऊन श्री. प्रवर्तक वेगळे निघाले आणि ग्वालेरहून श्री. नारायणराव पाठक आणि उमडेकर यांच्या नेतृत्वाखाली संस्था चालली. सावळाराम नवीन शाळेंत गेले. अभिनव संगीत विद्यालयाची स्थापना झाली. वार्षिकोत्सव प्रसंगीं श्री. कृष्णा जोशी यांचेबरोबर सावळाराम यांना गातांना पाहून त्यांच्या घरच्या मंडळींनाहि आश्चर्य वाटलें होतें. १९२६ मध्ये त्यांची शाळा सुटली.

आता संगीत हा त्यांच्या जीवनाचा स्थायिभाव झाला होता. वाडेगांवकरांनी अंधविद्यालय काढलें. सावळाराम तिथे वॉर्डन विद्यार्थी आणि शिक्षक या नात्यांनी कामें करूं लागलें. १९३३ पर्यंत त्यांनी तिथे काम केलें आणि जुलै महिन्यांत "सावळाराम संगीत विद्यालयां" ची स्थापना केली.

कलावंताची खरी किंमत कलावंतालाच कळते. मास्तर दीनानाथाच्या गाण्याला ते एकदा गेले. मास्तरांचे 'नीके नीके शोभा—' हें पद त्या दिवशीं अप्रतिम रंगले. सावळारामांना आपली कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय राहवलें नाही. आपली बांसरी ऐकविण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. दीनानाथांनी त्यांचा कार्यक्रम केला. त्यांचे तबलजी श्री. बल्ल्याबस्ताद यांच्या साथींत दोन तासपर्यंत सावळारामांनी बांसरीवादन केलें. दीनानाथ खूष झाले. ते म्हणाले—

"सावळाराम, अप्रतिम काम आहे आपलं ! मी सारा हिंदुस्थान पाहिला. पण बांसरीवर रागदारी आपल्याकडूनच प्रथम ऐकली—"

सावळारामाच्या अंगुलीमध्ये अप्रतिम कौशल्य आलें आहे. सारंगीसारख्या तंतुवाद्यामध्ये सूर तुटूं न देतां अखंड चालू ठेवण्याची जी गोडी आहे, ती सावळारामांच्या बांसरींत आहे. देसी, तोडी, भैरव, भैरवी, मालकौंस, वसंत असे एकापेक्षा एक चढे राग ते लीलेने रंगवितात. स्वरास्वरांवरचीं आंदोलनें अग्रांच्या तळव्यांच्या कमीजास्त दाबाने ते व्यक्त करतात. बिसमिल्लाचे शहनाईतून स्वर काढण्याचें जें अप्रतिम कौशल्य आहे तें सावळारामांचें काम पाहात असतांना आठवतें. दृष्टीसमोर लक्ष वेधायला इतर व्यवसाय नसल्यामुळे ते चटकन सूरसागरांत विलीन होतात. ख्यालाची गायकी ते सही सही वठवितात. ते स्वतः गायक आहेत. ते नागपूर नभोवाणीवर गातात. बांसरीसारखीं वाद्यें वाजविणाऱ्यांच्या आवाजावर वाईट परिणाम होतो असें म्हणतात. पण सावळारामांचा आवाज अजून 'त्या' अर्थी फुटला नाही. या गायकीमुळे बोलताना, गमकांच्या ताना, चक्री ताना वगैरे गाण्याचे प्रकार ते

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्या बांसरीतून लीलया काढतात. मुंबई नभोवाणीचें श्री. दिनकरराव अमेंबळ हे एक जर सोडले तर सावळारामांइतका तयार बांसरीवादक मी अजून ऐकला नाही. श्री. पन्नालाल हे बन्सी वाजवितात. पण त्या वाजविण्याची बात निराळी, धर्म निराळा.

सावळारामांनी एका खाजगी बैठकीत वाजविलेलें ' वद जाऊं कुणाला शरण ग ' या करुणरम्य पदाची मला अजून आठवण येते. ' नाचले ग थवे यादवाचे ' ही ओळ वाजवीत असतांना तर अगदी प्रत्यक्ष नाचच चालू आहे असा भास व्हायचा. ' मम आप्त बंधु बांधव प्रार्थिती कथुनि दुःख मनींचें ' या पंक्तींनी तर बहार उडवून दिली. दुःखाचे जणुं कढ येत होते त्यां बांसरीतून. इतकें अद्भुत सामर्थ्य त्यांच्या हातांत आलें आहे.

सांवळाराम उत्कृष्ट पेटीवादकहि आहेत. जवळ जवळ सर्वच प्रसिद्ध गायकांची त्यांनी उत्तम साथ केली आहे. अब्दुल करीमखाँ, फैय्याजखाँ, पं. ओंकारनाथ, शांता आपटे, सौ. गंगुबाई हुबळीकर, निसारहुसेन बडोदेवाले, सवाई गंधर्व, पं. विनायकबुवा इत्यादिकांबरोबर त्यांनी साथ केली आहे. उत्कृष्ट शिक्षक म्हणूनहि त्यांचा लौकिक आहे. हिंदुस्थानांतील संगीताच्या प्रथम डॉक्टर झालेल्या सौ. सुमति मुटाटकर या त्यांच्याकडे १९३९ ते १९४३ पावेतों शिकत होत्या.

ज्यांना त्यांच्या कलेचा आस्वाद घेतां आला नाही, त्यांनी त्यांच्या ध्वनि-मुद्रिकां ऐकाव्या. काफीतिलक कामोद, मांड भैरवी, भूप-श्यामकल्याण व चंद्रिका ही जणुं-दरबारी ह्या त्या चार ध्वनिमुद्रिका होत! यांतील पहिली विशेष लोकप्रिय झाली.

सावळाराम प्रथमतः जरा अबोल वाटतात. आपली पराधीनता त्यांच्या लक्षांत असल्यामुळे कुठेहि गायक मंडळींत जाऊन पुढे पुढे करण्याची त्यांची प्रवृत्ति नाही. परंतु एकदा ओळख झाली म्हणजे त्यांच्या नर्मविनोदाची मजा कळते. मला एक प्रसंग आठवतो. १९४४ मध्ये नागपुरांत संगीत परिषद भरली होती तेव्हाचा. आमचा वृंदवादनाचा कार्यक्रम झाला त्या रात्रींची गोष्ट. थंडी कडाक्याची पडली होती. चहा घ्यायला आम्ही बाहेर पडलों. दुकानदाराने ' गुडकी चाय ' असा बोर्ड लावला होता. मी मास्तरांना सांगितलें, ' साखरेचा चहा नाही '.

आम्ही ते गरम पाणी घेतलें. मास्तर म्हणाले, ' अगदीच गुळवणी आहे—' अन् एक घोट घेऊन दुकानदारास उद्देशून ते म्हणाले—

" तुम्हारी गुड की चाय कितनी बॅड बनी है. "

त्यांनी आपलें जीवन आनंदी वृत्तीने सुसह्य केलें आहे.

" तुम्ही अमुक सिनेमा पाहिला कां ? " असें त्यांना विचारतांच ते म्हणतील-

" हो ! कालच सेकंड शो ' ऐकायला ' गेलों होतों. " अन् अगडबंब हसतील.

त्यांची स्मरणशक्ति अतिशय तीव्र आहे. नुसत्या आवाजावरून, ते तुम्हाला नांवाने हाक मारतील, कधी विसरायचे नाहीत.

त्यांच्यासारखीं गुणी व कल्पक माणसें नागपूरसारख्या गावीं खितपत पडलीं आहेत. पण त्यांच्या बांसरीच्या सादेने, गोकुळींच्या कृष्णासारखे, रसिकांचे सारे वृंदावन ते आपल्याभोंवती निर्माण करतात ही काय कमी किमया आहे !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कजलीचें धन

*

ना. रा. शेंडे

[आज मंत्रतंत्रावर कुणाचा विश्वास नाही हें बरेंच आहे. एके काळीं असले चमत्कार होत नि त्यावर लोकांचा विश्वासहि असे. 'कजली' हा धन शोधून काढण्याचा एक मंत्रतंत्रात्मक विधि आहे. कजलीसंबंधीचे कितीतरी चमत्कार लोक सांगतात. प्रस्तुत प्रकरणाचे लेखक स्वतः ज्या प्रसंगांतून गेले त्याचें वर्णन त्यांनी केलें आहे—सं. यु.]

रात्रीं अकराचा सुमार असेल. घन्या मांत्रिकानं मला हाक दिली तेव्हा तो म्हणाला, "अरे चल ऊठ लौकर. राघोबानं तुले बलावलं."

राघोबाचा हुकूम मला अमान्य करतां येत नव्हता. बरेच दिवसांपासून मी त्याची आज्ञा शिरसावंद्य मानीत आलों होतों. त्याला तशीं कारणेंहि होतीं. मी ताडकन् उठलों. डोक्यावर टोपी चढवली अन निघालों घन्याबरोबर.

राघोबा माझी वाटच पाहात बसला होता. तीनचार दणकट माणसें पावडें-कुदळी घेऊन चिलीम ओढत बसलीं होतीं. मला पाहातांच राघोबाने हुकूम सोडला "अरे चला उठारे आला हाये देव." माणसांनी चिलीम गुंडाळून ठेवली आणि पावडें-कुदळी घेऊन ते उठले. मी म्हणालों, "कागा राघोकाका, कुठसा जावाचे हाये?"

"अरे हळू हळू बोल; हं अगोदर वाटेले लाग. मंग समद उमगन; हं, चलारे" राघोबाने पगडी चढवून माझा हात धरीत घराबाहेर पाऊल टाकलें.

खेड्यांतील भयानक अंधार. त्यांतून त्या दिवशीं अमावास्या. पौषाचा महिना. कडक थंडी पडलेली. घन्या मांत्रिक पुढे, त्याच्या मागे मी, आणि माझ्या मागे राघोबा आणि मंडळी. ठेंचाळत आणि एकमेकाला सांवरीत आम्ही गावालगतच्या एका ओढ्याजवळ आलों. मांत्रिक थबकला अन् मग आम्ही सर्व थांबलों. मांत्रिकाने ओढ्याच्या तीरावर एक रेघ ओढली. कापूर जाळला. मनांतल्या मनांत कोणतासा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंत्र उच्चारला. "जय पावन माते" तो म्हणाला आणि मग आम्ही दबक्या आवाजांत 'जय पावन माते' असा घोष केला.

त्यानंतर ओढा ओलांडला, आणि आठदहा पावलें पुढे गेलों न गेलों तोंच राघोबा दचकून ओरडला– "अरे बापरे!"

"अरे, काय झालं राघो, काय झालं" म्हणत मांत्रिक राघोजवळ आला.

"पाह्य, पाह्य, धन्या पाह्य; पायावरनं काय त गेलं गाऽ."

धन्यानं काडी शिलगावली तो जवळच मला मोठा नाग फणा काढून आमच्याकडे टवकारून पाहात होता. आम्ही सगळेच घाबरलों. धन्याने मंत्रजप केला, आणि आम्हाला म्हटलं, "हात जोडा अन् पुढंच पाहात चला, या मांगोमांग." एकमेकाला बिलगून आम्ही पुढे जाऊं लागलों. मी म्हणालों, "कागा धनूदादा, राघोकाकाच्या पायावरून नाग गेला तवा हें लक्षण मले ठीक दिसत नाई." मांत्रिक म्हणाला, "अरे तुले कांही समजत नाईं. आजचं लक्षण लई बरं हाय. राघोबा मोठा भागवान दिसते."

आम्ही स्मशानघाटाजवळ आलों तेव्हा नदीवरील पायपिंग फॅक्टरींतून बाराचे टोले कानीं पडले. मांत्रिक म्हणाला, "चला घाई करा. अर्ध्या घंट्यामंधी जागा हेरली पाहिजे. नाई त समदं वाया जाईन."

घाईघाईने आम्ही पुढे सरकूं लागतो तोंच सदबानं किंकाळी फोडली. त्याचा एक पाय खड्ड्यांत अडकला होता आणि दुसरा एका प्रेताच्या सांगाड्यांत अडकला होता. मांत्रिकाने पुन्हा मंत्र मारला आणि त्याला ओढून काढलें. पण सदबा इतका घाबरला की तो पुढे यायला तयारच होईना. परंतु "तुला परत बातां येणार नाही आणि जाशील तर भुन्या भूत तुला पछाडेल" असा दम धन्याने भरला तेव्हा कुठे लंगडत लंगडत सदबा येऊं लागला.

जेव्हा आम्ही स्मशानघाटावर पोहोंचलों तेव्हा "हू हू हू" असा भीतिदायक सूर कानीं पडून झर्‌रकन् कुणी पुढून गेल्याचा भास झाला. मला तर कापरेंच भरलें. मांत्रिक म्हणाला, "थांबा तुम्ही जागच्या जागीं. अमावास्या हाये. सैतान उठावाची येळा झाली." आणि मग त्याने माती उचलून ती भारून काढली व प्रत्येकाला थोडी थोडी देत म्हटलें, "बांधून ठेवा बेस. मंग नाई भेव कोन्या सैतानभुताचं." अन् तो एका प्रेताच्या ढिगाऱ्यावर चढला. तेथे कापूर जाळून कसला तरी मंत्र उच्चारला आणि सदबा, जन्या, धोंडूला म्हणाला, "उकरून काढा रे येथली माती." माणसें माती उकरायला लागलीं आणि राघोबा कजळीची डबी काढूं लागला.

कजली—

एक छोटीशी डबी. मेण आणि कांही वनस्पति, काजळासारखी वस्तु—मिळून त्या मसाल्याची ती एक जादूची डबी. धन कुठे, किती अंतरावर, कोणत्या स्थितींत गाडलें आहे तें तिथे ज्याला तें हवें त्यानेच त्या डबींत पाहून सांगायचें. त्याला तें तेथे स्पष्ट दिसायचें. गणेशपूरच्या राघोला धनाची भारीच लालसा. असें भलें मोठें धन आपल्याला सांपडावें व आपण खूप श्रीमंत व्हावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा. तसें पाहिलें तर राघोबा कांही गरीब नव्हता. त्याला थोडी शेती होती.

 संत्र्याच्या बागा होत्या. सावकारी होती. पण गेल्या सहासात वर्षांत त्याला कजळीचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भलताच छंद लागला आणि त्यापायीं त्याने आपल्या इस्टेटीची धूळधाण केली होती. कोण्या एका साधूने त्याच्या नशीबांत काजळीचें धन आहे असें भाकीत केलें होतें. राघोबा ह्या भाकितामुळं अगदी बेचैन झाला होता. आणि म्हणून जीवाची पर्वा न करतां असलेला पैसा ह्या कामीं खपणाऱ्या माणसांना देऊन त्याने अहोरात्र असे प्रयोग आरंभिले होते, आणि आजचा प्रयोग त्याच्या आयुष्यांत अगदी शेवटला ठरणार असें तो सांगत होता.

काजळी पाहावयाची म्हणजे एका पायाळू माणसाची गरज भासायची. त्याशिवाय काम फत्ते होत नाही असा खेडुतांचा समज. ज्या जागीं धन शोधून काढावयाचें त्या जागेला पायाळू माणसाने लायेने स्पर्श करायला हवा. राघोबा माझा उपयोग एवढ्याचसाठी करायचा. असा पायाळू माणूस त्याचा देव. देव म्हणूनच त्याने हाक द्यायची. राघोबाचे हे काजळीचे प्रयोग सुरू होते त्यावेळीं माझें वय चौदापंधरा वर्षांचें होतें. अगदी बारीकसारीक गोष्टींकडे माझी नजर असायची. स्मशानघाटावर राघोबाने डबी काढली तेव्हा मी म्हटलें, "राघोकाका, ह्या बक्ताले तुही मंशा पुरी होईल असं माहं मन सांगतें गा!" राघोबाने मला कुरवाळलें आणि म्हटलें, "देवा तुले जरीरेशमाच्या कपड्याने सजवीन आन् हिऱ्याची आंगठी नजर करीन!"

नंतर राघोबाने डबींत पाहिलें अन् तो उद्गारला, "गावाजवळच्या नाल्याजवळ उजव्या बाजूले सावरीचं झाड हाये. त्या झाडापासनं तेरा पावलं सूर्यां निघते त्या बाजूले धन हाये. एक इवलुसं टेकर हाये आन् टेकरावर पिंपराचं झाळ उंगवून राह्यलं!"

माणसांनी प्रेतावरील माती उकरून काढली आणि मांत्रिकाने त्या प्रेतावरील जीर्ण झालेलें कापड काढलें. काजळीसाठी नुकत्याच पुरलेल्या प्रेतावरचें कापड लागत असतें.

हें काम आटोपल्यावर आम्ही ओढ्याजवळील सांवरीच्या झाडाखाली आलों. राघोबाने पिंपळाचें वाढत असलेलें उंचवट्यावरील झाड शोधून काढलें. घन्याने— मांत्रिकाने त्या जागेवर जाऊन मंत्र उच्चारले व साधारणतः चारपांच फूट रुंदीचा एक परीघ काढून आम्हा सर्वांना त्या रेषेच्या आंत यायला सांगितलें. मग मांत्रिकाच्या सांगण्यावरून मी त्या जागेच्या बिंदूला पायाने स्पर्श केला. घन्याने तेथे चार लिंबें भारून ठेवलीं व कापूर जाळला आणि मग तो माणसांना म्हणाला, "चलारे, काढा खनून ही जागा. जरा घाई करा. नाही त त्या धनाचा जो जुना मालक असन तो धावल् न समदं काम बिघडन्!"

माणसांनी कमरेइतकी जागा खणून काढली. तेव्हा कुदळीच्या एका वाराचा खणकन् आवाज झाला.

"पाह्य, पाह्य, धनाले कुदळ लागली. करा करा घाई. खोदा खोदा बाजूबाजूनं" राघोबा उल्हासाने म्हणाला. माणसें जोरजोराने खणूं लागलीं. राघोबा डबींत पाहूं लागला.

"अरे करा घाई. धनाचा मालक निघाला हाये धन वाचवाले. अर्ध्या कोसावर हाये तो तोवरी काम झालं पाह्यजे फत्ते!"

माणसं सपासप जागा खणून काढत होतीं. राघोबा टक लावून डबी पाहातच होता. तोंच राघोबा पुन्हा जोराने म्हणाला,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"अरे दोन हात घन उजव्या बाजूले सरकलं, खना दोन हात तिकडे." दोन हात जागा खणण्यांत आली. पुन्हा खणकन् आवाज झाला. सर्रर असा आवाज होऊन घन आणखी एक हात पुढे सरकलें. खणणें सारखें सुरूच होतें. शेवटी खण्-खण् खण् असा स्पष्ट आवाज येऊं लागला. मांत्रिक खड्डयांत उतरला आणि संगतीं आणलेली मेणबत्ती लावून म्हणाला—"सांपडलं रे सांपडलं! ह्या बाजूनं थोडं खणा म्हणजे झालं!" संपूर्ण जागा खणून झाली आणि तीन गुंड मोठ्या प्रयासाने वर काढण्यांत आले. प्रत्येक गुंड सोन्यारुप्याने भरलेला होता. राघोबाच्या आनंदाला सीमाच नव्हती! "पावला! पावला महादेव पावला!" नाचत नाचत तो उद्गारला.

ते गुंड घेऊन मोठ्या खुषींत आम्ही राघोबाच्या घरीं आलों तेव्हा कोंबडे बाग देऊं लागले होते व आकाशांत शुक्राचा तारा तळपत होता. राघोबाने ते गुंड देव्हान्यावर ठेवले आणि प्रत्येकाला पांच पांच रुपये देऊन आपापल्या घरीं जाण्याची सूचना दिली. मला मात्र दहा रुपये देऊन व माझ्या चरणावर डोकें ठेवून तो पुटपुटला, "देवा, अशीच किर्पा राहूं दे बाप्पा!"

आम्ही आपापल्या घरीं गेलों. राघोबाने प्रत्येक गुंडाच्या तोंडाला कापड बांधून ठेवलें आणि तो तेथेच झोंपला.

राघोबाला हर्षातिरेकामुळे झोप आली नाही. चांगलें उजाडलें तेव्हा तो उठला. स्नान आटोपलं. पूजाअर्चा आटोपली आणि मग तो गुंडांजवळ गेला. पहिल्या गुंडावरचें कापड त्याने मोठ्या आनंदाने बाजूला सारलें. तोंच "फूंऽऽ" करीत नागाने डोकें वर काढलें. घाबरून राघोबा मागे सरला. थोड्या वेळाने त्याने दुसऱ्या गुंडावरलें कापड वेळूच्या टोकाने काढलें. तेथेंहि नागाने डोकें वर केलें. तिसऱ्या गुंडाचे वेळेला अगदी तोच प्रकार घडला.

राघोबा भीतीने गांगरून गेला. "धावा! धावा!!" त्याने आरडाओरड केली. लोक धावून आले. मांत्रिकहि धावला. सर्वांनी पाहिलें पण कोणाला नाग आढळला नाही. मांत्रिकाने हिय्या केला. त्याने गुंडांत डोकावून पाहिलें. त्यालाहि नाग दिसला नाही. पण तो ज़ोराने म्हणाला, "अरे! येथें नाग नाही. आन् धनहि नाही. गुंड रिकामेच हायेत!" हें ऐकतांच राघोबाला मूर्च्छा आली आणि तो धाडकन् जमिनीवर पडला. त्याला शुद्धीवर आणल्यावर मला बोलावण्यांत आलें. मांत्रिकाचें म्हणणें कीं राघोबाने मनांत कांही वाईट चिंतिलें असेल. पायाळूला बोलवा आणि त्याच्या पायाचा स्पर्श तीनहि गुंडांना होऊं द्या. नशीबांत असेल तर धन परत येईल. तें कुठं गेलं नाही. आहे तें इथंच. नागोबानं तें आपल्या ताब्यांत घेतलं आहे!"

मी गेलों आणि प्रत्येक गुंडाला पायाने स्पर्श केला. पण कांहीच घडलें नाही. ना नाग आढळला ना धन आढळलें. त्या दिवसापासून राघोबा वेडा झाला. तो खूप जोरजोराने ओरडायचा–रडायचा, जो कुणी भेटेल त्याला विचारायचा, "काग माझं धन कोठी दिसलं का तुले?" रात्रंदिवस त्या गुंडांजवळ पडून राहायचा अन् एकसारखा—"माह्या धना, ये बापा ये" असें बडबडत असायचा. तीनचार महिने तो असाच पडून राहिला आणि एके रात्रीं तो त्या गुंडांजवळ एका सुरांत 'माझं धन–माझं धन' करीत ज्या सुमाराला त्याचें हातीं धन लागलें होतें त्याच सुमाराला मरण पावला!

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लोक म्हणायचे, कजलीचें धन, लाखांत एखाद्यालाच लाभतें आणि एखाद्यालाच कळतें !

आज कोणी त्या घराची छावणी करीत नाही, मोडतोड झाल्यास दुरुस्ती करायला धजत नाही. रात्री त्या घरांत राघोबाचं भूत धिंगाणा घालतें आणि नाग इकडून तिकडे फिरत असतो असें वस्तींतील लोक सांगत असतात. मी जेव्हा केव्हा गावीं जातों तेव्हा माझी नजर त्या घरावर पडते. घर मोडकळीस आलें असून देव्हाऱ्याचा भाग तर पूर्णच कोसळून पडला आहे. पण दुरूनहि गुंडाचा भाग ओझरता अजूनहि नजरेस पडतो.

—आणि मला राघोबाची वेडी मूर्ति दिसत असल्याचा भास होतो !

• • •

महाकोसलच्या प्राचीन इतिहासावर नवीन प्रकाश

कुमारवरदत्त हाच छत्तिसगडचा सर्वांत प्राचीन ज्ञात राजा

(ले. प्रा. वा. वि. मिराशी, नागपूर)

छत्तिसगडांतील पूर्वीच्या सक्ति संस्थानांत सक्ति शहरापासून सुमारें १४ मैलांवर गुंजी नामक एक लहानसें गाव आहे. त्या गावाजवळ एका टेकडीच्या पायथ्याशीं दमौ दढा या नांवाचें एक कुंड आहे. या कुंडांतील पाणी जवळच्या टेकड्यांतून येतें व तें अथांग आहे असा समज आहे. या कुंडाच्या जवळच एक मोठा खडक असून त्यावर एक अत्यंत प्राचीन लेख कोरला आहे. हा लेख कै. डॉ. देवदत्तपंत भांडारकर यांनी सन १९०३ मध्ये पाहिला होता. सबंध लेख त्यांना वाचतां आला नव्हता, असें दिसतें. तथापि त्यांतील कांही मिती व नांवें [बरीचशीं चुकीचीं] वाचून त्यांनी त्या लेखासंबंधीं लहानसें टिपण पश्चिम हिंदुस्थानच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याच्या सन १९०३–०४ सालच्या अहवालांत प्रसिद्ध केलें होतें.

डॉ. हिरालाल यांचें अनुमान

त्या टिपणांत एका नांवामागे 'येर' असा शब्द डॉ. भांडारकरांनी वाचला होता. त्याच्या आधारावर कै. डॉ. हिरालाल यांनी त्या कुंडानजीक बौद्ध भिक्षूंचा आश्रम असावा, असें अनुमान केलें होतें. माझ्या विनंतीवरून हिंदुस्थान सरकारचें प्राचीनलेखनविशारद डॉ. छाबडा यांनी या लेखाचे उत्कृष्ट छाप घेऊन त्यांपैकी एक कांही वर्षांपूर्वी मजकडे पाठविला होता त्यावरून वाचन करून तो लेख मी एपिग्राफिया इंडिकामध्ये नुकताच प्रसिद्ध केला आहे. 'तरुण भारता' च्या वाचकांकरिता त्यांतील माहिती येथे संक्षेपाने दिली आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हा लेख साडेसहा फूट लांबीचा असून प्राचीन ब्राह्मी लिपींत व प्राकृत भाषेंत लिहिला आहे. लिपीच्या वळणावरून तो इ. सनाच्या पहिल्या शतकांतील असावा असें अनुमान करतां येतें.

लेखांतील निर्देश

या लेखांत कुमारवरदत्त नामक राजाच्या कारकीर्दीच्या पांचव्या व सहाव्या वर्षी त्या राजाचा अमात्य बोधदत्त याने ब्राह्मणांना एक एक गोसहस्रदान ऋषभतीर्थ येथे दिलें होतें, असा निर्देश आहे. पहिलें दान हेमन्तऋतूंतील चौथ्या पक्षाच्या पंधराव्या दिवशीं व दुसरें दान ग्रीष्मऋतूंतील सहाव्या पक्षाच्या दहाव्या दिवशीं दिलें होतें. ऋतु व पक्ष यांमध्ये मिती देण्याची ही पद्धत अत्यंत प्राचीन लेखांत आढळते. अशोकाच्या लेखांत याच तऱ्हेचे उल्लेख आहेत. दान देणारा बोधदत्त हा अमात्य असून शिवाय दंडनायक (मॅजिस्ट्रेट) व बलाधिकृतहि (सैन्यावरील अधिकारी) होता. याशिवाय इंद्रदेव नामक दुसऱ्या एका दंडनायक अमात्यानेहि ब्राह्मणांना गोसहस्रदान दिल्याचा यांत उल्लेख आहे.

पण राजाचें नांव दिलेलें नाही

या लेखापेक्षां प्राचीन असे दोन लेख छत्तीसगडांत रामगड व किरारी येथे सांपडले आहेत. पण त्यामध्ये तत्कालीन राजाचें नांव नाही. तेव्हा कुमारवरदत्त हा छत्तीसगडचा ऐतिहासिक काळांतील सर्वांत प्राचीन असा ज्ञात राजा होय.

अत्यंत प्राचीन तीर्थ

गोसहस्रदान (हजार गाईंचें दान) हें महादानांपैकी एक असून पुराणामध्ये याची महती वर्णिली आहे. प्रस्तुत लेखांत ज्या ऋषभतीर्थी कुमारवरदत्ताच्या अमात्यांनी तीन गोसहस्रदानें दिलीं, तें तीर्थ सध्याचें गुंजा गावाजवळचें दमौ दढाच होय, याविषयी प्रस्तुत लेखावरून संशय राहत नाही. कोसला किंवा छत्तीसगड यांतील हें ऋषभतीर्थ अत्यंत पवित्र गणलें जात असे. महाभारताच्या वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांत या तीर्थाच्या ठिकाणीं तीन रात्र उपोषण केल्यास वाजपेय यज्ञ केल्याचें पुण्य मिळतें असें वर्णन केलें आहे (ऋषभं तीर्थमासाद्य कोसलायां नराधिप। वाजपेयमवाप्नोति त्रिरात्रो पोषितो नरः॥) त्यावरून गुंजी गावाजवळचें हें तीर्थ दोन हजार वर्षांपेक्षा प्राचीन आहे, असें दिसून येईल. हिंदुस्थानांतील अत्यंत प्राचीन तीर्थांमध्ये याची गणना होईल.

बौद्धांचा संबंध नाही

डॉ. भांडारकरांनी वाचलेला ' थेर ' हा शब्द प्रस्तुत लेखांत कोठेंच दिसत नाही; व त्याशिवाय या तीर्थानजीक बौद्धभिक्षूंची वसति होती असें मानण्यास दुसरा कांही आधार नाही. महाभारतांतील वर्णनावरून व प्रस्तुत लेखांतील ब्राह्मणांना दिलेल्या गोसहस्रदानांवरून ऋषभतीर्थ हें हिंदूंचेंच पवित्र स्थान होतें, यांत संशय नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अपराध—

[भूपति]

विधिवशें जाहली होती अपुली प्रीति
चिरकाळ निभवणें होतें अपुल्या हातीं
पण केला आपण कृपणपणा स्नेहात
कळवळतो; विझतां शुष्क होऊनि ज्योति ! १

नैसर्गिक फुलला वसन्त दो हृदयांत
दो यौवनसरिता शोधति संगमप्रान्त
व्यवधान तयांपरि झाला संयम–मेरु
नच नवल मुळीहि जुळती न अपुले पंथ ! २

राणी, तव रुसवा गमे जगाहुन न्यारा
मर्यादित असतो शिशिराचाहि वारा
किती अनुनय केला स्वर्ण–क्षण वेचून
अन्तरांतिल विरे सुगंध अन्तीं सारा ! ३

नन्तर तूं गाता पण प्रणयाचें गीत
मी विरक्त होऊन श्रवलें तें संगीत
करण्यास साथ त्या इष्ट जरी मज होते
अपमान वाटला परि मज मृदुलपणांत ! ४

दोघांची कारण वृत्ति विफल प्रीतीला
म्हणुनिच असा हा विषमय अनुभव आला
बघतां न वायुची दिशा लोटके तारुं—
—तें मध्येच फुटतां द्यावा दोष कुणाला !! ५

चन्द्रशेखर रं. शहाणे

*

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" एकांकिके " संबंधीं थोडेंसें

शं. वा. कुळकर्णी

[एकांकिकेसंबंधीं अधिक विवेचनात्मक लेख आल्यास 'युगवाणी' त्यांचा योग्य गौरव करील— सं. यु.]

कथावाङ्मयांत ज्याप्रमाणे लघुकथा, त्याप्रमाणे नाट्यवाङ्मयांत एकांकिका. पुष्कळांना वाटतें की एकांकिका हा विसाव्या शतकांतील नवा नाट्यप्रकार आहे. फार पूर्वीपासून एक अंकी नाट्यप्रकार अस्तित्वांत आहे. पंधरा ते सतरा शतकांपासून ग्रीक–इटली आदि पाश्चात्य देशांतील वाङ्मयांत एकांकिका "फार्स" च्या स्वरूपांत स्वतंत्रपणें उदयास आल्या आहेत. आपल्याकडे देखील तमाशे, दंढार, नौटंकी हे एकांकिचेच अवतार म्हणून मानायला हरकत नाही.

सुरवातीचीं इंग्रजी नाटकें व मध्ययुगीन संवाद ही जवळजवळ एक अंकी नाटकेंच होतीं. "प्युरिटन" लोकांनी १६४२ मध्ये जेव्हा नाटकगृहें बंद केलीं तेव्हा फिरते नट कायदा डावलून, छोट्या छोट्या "फार्स" वजा किंवा "ड्रॉल्स्" म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या एकांकिका अभिनयीत असत. पुढे अठरा व एकोणीसाव्या शतकांत "कर्टन-रेझर्स्" किंवा "आफ्टर-पीसेस्" च्या स्वरूपांत पुष्कळ एकांकिका लिहिल्या गेल्या.

अशा प्रकारें वरील प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें जरी देतां आलीं तरी एवढें मात्र निश्चित म्हणतां येईल की एक अंकी नाट्यप्रकाराचें हवें तसें संशोधन पूर्व किंवा पश्चिमेंत कुठेच झालें नाही. परंतु विसाव्या शतकांत इंग्लंड–अमेरिकेंत एकांकिका उदयास येत असून तो एक विशिष्ट दर्जाच्या उच्च गुणविशेषाचा प्रकार गणला जात आहे. आपल्याकडे देखील कांहीजणांनी तसा प्रयत्न करून पाहिला. पण तो हवा तसा यशस्वी झाला नाही.

लघुकथेप्रमाणेच एकांकिकेचें एक विशेष असें तंत्र आहे. एक अंकी नाटक हें तीन अंकी नाटकाचें "बालरूप" नाही किंवा एकांकिका ही तीन अंकी नाटकाचें "विराट रूप" धारण करूं शकत नाही. दोहोंतील फरक त्यांच्या स्वभाव आणि रचनेंत आहे. एकांकिका ही एकच प्रमुख प्रसंग हाताळते व एकच परिणाम प्रसवते. अल्पशा वेळांत तिला वठवावयाची असल्यामुळे, सुरवातीपासून शेवटपर्यंत प्रेक्षकांना ओढत नेण्याची हातोटी तिच्यांत साधली असते. एकांकिकेच्या बांधणींत रचना, संवाद, वास्तवता यांचें सौष्ठव कटाक्षाने पाळलें पाहिजे; आणि त्याकारितां विशिष्ट प्रकारचा व्यासंग व रंगभूमीचें यथावत् ज्ञान असण्याची अत्यंत गरज आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकांकिकेला आदि-मध्य-अंत असला पाहिजे. संवादाची गुंफण सुंदर, सुटसुटीत व सुमधुर असली पाहिजे. या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही की संवादाचा विचारओघ, आगगाडीच्या रुळासारखा "अ" ते "ब", "ब" ते "क" असा सरळ व धोपट मार्गाने धावत जाणारा नसून "अ" ते "क" "इ" ते "ई", "ई" ते "न", "ब" ते "क", "क" ते "अ" असा पुढेमागे उड्या घेतघेत व छलांगा मारीत मारीत, वातावरण बनवीत, स्वभावाची फोड करीत, वास्तवतेचा भास निर्माण करीत जाणारा असतो. प्रत्येक भाषण सहज, स्वाभाविक, बोलणाऱ्याचें व्यक्तित्वदर्शक भासलें पाहिजे.

इतर कलांप्रमाणे नाट्यकला ही निव्वळ अनुकरणात्मक नाही. मानवी जीवनापासून मिळालेला ओबडधोबड माल गोळा करून त्यावर वास्तवपूर्ण कल्पकतेचा साज नाट्यकलेंत चढविला जात असतो. कारण वास्तवतेच्या पातळीवरून मारलेली कल्पनेची भरारी प्रत्यक्षांत उतरवून दाखविणारी कला म्हणजेच नाट्यकला.

एवंच, लघुकथेप्रमाणे एकांकिकादेखील लाघवी करण्याकरिता पुढील मंत्र-तंत्रांची पूर्वतयारी व सिद्धता लागते—

१. कथावस्तूची निवड.

२. निवडलेल्या कथानकाचा कच्चा आराखडा. सापळ्याच्या स्वरूपांत त्याची मांडणी.

३. स्थळ-काळ-परिस्थिती, वातावरण, दृष्यें, सजावटीचें शब्दचित्र.

४. पात्रांच्या रूप-गुण-दोष, स्वभाव-सवयी, वेशभूषा, ठेवणीचें टांचण.

५. संवादाची पात्राबरहुकूम विविधता, विचित्रता, विशेषता दाखविणारी स्वाभाविक रचना.

वरील प्रमाणे सर्व सामुग्रीचा मसाला तयार झाल्यावर त्याची आदि-मध्य-अंत दर्शक जुळवण, गुंफण, बांधणी करून प्रेक्षकांना गुंग करून सोडणारा, परिणामकारक असा एकांकिकेचा पक्का माल रंगभूमीवर आणायचा असतो. नाट्यलेखनांतील "सस्पेंस्" व "सर्प्राइज" चें तत्त्व विसरतां कामा नये. यीटस् या पाश्चात्य विद्वानाने या बाबतींत फक्त एकच धडा शिकविला; तो म्हणजे—"Surprise ... ... is what is necessary. Surprise and then more surprise, and that is all." तात्पर्य, एकांकिका ही अशी असली पाहिजे की तिच्या तावडींत सापडलेला प्रेक्षक मंत्र–मुग्ध नागाप्रमाणे सुरवातीपासून शेवटपर्यंत पुरेपूर भारला गेला पाहिजे.

पुष्कळ वेळा तीन अंकी नाटकाचा प्रेक्षकाला कंटाळा येतो. आणि लघुकथेप्रमाणे दर अंकांत कांहीतरी नवीन पहाण्याची त्यांना इच्छा होवू लागते. अशा वेळीं सर्वतोपरि परिपूर्ण–विविधरसप्रधान असा नवनवा रुचिपालट घडवून देण्याचें लोकरंजनात्मक कार्य एकांकिकाच करू शकते. तेव्हा तीन अंकी एकाच नाटकाच्या लांबणीपेक्षा एक अंकी तीन निराळी नाटकें प्रेक्षकांना सादर करण्याचा अभिनव उपक्रम आपल्याकडील नाट्यलेखकांनी व नाट्यसंस्थांनी सुरु केल्यास नाट्यकलेच्या क्षेत्रांत नवनाट्याभिरुचि हमखास निर्माण होईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गृहिणी सचिवः सखी मिथः

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व महाराष्ट्राचे सुविख्यात साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या सुविद्य, सेवानिष्ठ सहधर्मिणी सौ. शांताबाई यांना ता. १८-८-५० रोजी नागपंचमीच्या दिवशी दुपारी देवाज्ञा झाली. त्यांच्या मृत्यूने किती नुकसान झालें याची कल्पना नागपुरांतील सामाजिक चळवळींशीं संबंध असणाऱ्यांना आणि श्री. माडखोलकरांच्या मित्रमंडळींना येऊं शकते. नागपूरमधील कुठलीहि सामाजिक चळवळ गेल्या दहा वर्षांत शांताबाईंच्या सेवेचें फूल घेतल्याशिवाय नांवारूपाला आली नाहीं. त्यांच्या सौम्य, शांत, निरलस व्यक्तित्वाचा प्रभाव घरीं बाहेरीं सारखाच पडायचा आणि त्यांच्या कृतिकृतींत आत्मविश्वास, दिलासा प्रतीत व्हायचा.

श्री. माडखोलकरांचें जीवन तर त्यांतील मृत्यूने अक्षरशः शुष्क झालें आहे. या अवस्थेंत भौतिक गरजांपेक्षा माणसाला हृदयाच्या गरजाच अधिक जाणवतात आणि त्यांतून श्री. माडखोलकरांचें म्हणजे साहित्यिकाचें मन— जें संवेदनाक्षम, लवचिक, पाऱ्यासारखें येवढ्यायेवढ्याशा अंतर्बाह्य बदलाने तीव्र चढउताराला येणारें असें! त्या मनाच्या लहरी सांभाळणारें, त्यांच्या गरजा पूर्ण करणारें माणूस मिळणें खरोखर मोठ्या भाग्याचें लक्षण. अशी साथ त्यांना मिळाली होती. त्यामुळे श्री. माडखोलकरांचें जीवन-संगीत सुरेल, सुसंवादी असें ठरलें होतें. सर्वसामान्य माणसांप्रमाणे त्यांच्यांतहि पुरुष-स्वभावाचे गुणदोष असणारच; पण गुणांच्या प्रकाशांत दोषांची झळ न लागूं देण्याचें कार्य शांताबाईंनी त्यांच्या जीवनांत केलें!

सव्यसाची म्हणून अजिंक्य ठरलेल्या शंकरालाहि पराभूत करणाऱ्या तपःपूतधनुर्धारी अर्जुनाने देखील भारतीय युद्धाची परीक्षा देतांना सारथी मागितला. मग इतरांची काय कथा! संगर संपला नाही, शस्त्रधारी उभाच आहे, रथहि घोडे जुंपून तयार आहे, फक्त सारथी नाही! सौ. शांताबाई अहेवपणीं गेल्या. पण जातांना माडखोलकरांचें जीवन मात्र "सचिव, सखी" विरहित करून गेल्या. माडखोलकरांना संसार राहिला नाही आणि चि. मीना व चंद्रशेखर यांना घर राहिलें नाही! ईश्वरेच्छा बलीयसी!

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" युगवाणी " (Yugavani) Regd. No. N 945

विक्रीस तयार

महाकवि भारवीकृत **किरातार्जुनीयम्** सर्ग ११-१२

मल्लिनाथाची टीका, पदान्वय, मराठी अर्थ व टिपणें यांसहित आणि

संस्कृतगद्यकुसुमाकर

यावरील टिपणें

संपादक

ग. त्र्यं. देशपांडे

एम्. ए., एल्एल्. बी.

संस्कृत व कायदा या विषयांचे प्राध्यापक

श्री शिवाजी महाविद्यालय, अमरावती.

प्रकाशक

ठाकूर आणि कंपनी लिमिटेड, अमरावती.

WANTED

Agents for the sale of our American Fountain Pens, Swiss Watches 1950 model on decent salary and allowances or commission. Write for Samples and Terms in, English to:—

BANSAL BROTHERS
Kothi Mem, DEHLI 6.

मुद्रक, प्रकाशक : प. वि. वेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ